शासन मान्य
प्रयत्न आमचे, विश्वास तुमचा...
दारू सोडवा
हमखास!
सिगारेट / गुटखा / गांजा / मावा सोडवा
(न सांगता किंवा सांगून सोडवा)
जनसेवा व्यसनमुक्ती केंद्र
डॉ.विलास पाठक : 8308113114, 9422240654
वेळ : सकाळी १० ते सायंकाळी ६
पत्ता: शिवाजी महाराज शॉपिंग सेंटर अलीपुर रोड बार्शी

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
दीपावलीच्या तमाम जनतेस हार्दिक शुभेच्छा !

लक्ष्मी लॉन्स मंगल कार्यालय
फक्त ५१०००/- रु.
जेवणासह (अटी लागू)
• निसर्गरम्य हवेशिर वातावरण • पाण्याची भरपूर सोय • जेवणासाठी स्वतंत्र हॉल • वधू-वरांना स्वतंत्र रूम्सची सोय • २४ तास लाईटची सोय
श्री स्वामी समर्थ सेवा आश्रम ट्रस्ट
अक्कलकोट-सोलापूर एन.एच.रोड, अक्कलकोट
मो. ९३२६१५८१५१ / ८६२५००५१११

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक १०२ वा | शुक्रवार, दि. १५ नोव्हेंबर २०२४ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

विकणे आहे
वासूद रोड वरील पाण्याच्या टाकीच्या उत्तरील बाजूस असणाऱ्या शिनगारे प्लॉट मधील क्लिअर टायटल प्रॉपर्टी (ट्वीन बंगलो) विकणे आहे.
संपर्क : डी. बी. शिंदे
मो.: ९५७९४२१४६५ ८२७५२७४३५३
पत्ता: अल्टिमेट जिमच्या समोर, सांगोला

# महायुतीला धक्का, विधानसभेला लोकसभेची पुनरावृत्ती होण्याचा अंदाज; सर्व्हेतून आकडे समोर

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** राज्यात विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरु असताना, मतदानाला अवघे पाच दिवस शिल्लक राहिलेले असताना लोकपोलनं केलेल्या सर्वेक्षणाचे अंदाज समोर आलेले आहेत. महाविकास आघाडीला राज्यात स्पष्ट बहुमत मिळेल, असा अंदाज लोकपोलनं वर्तवला आहे. महाविकास आघाडीला १५१ ते १६२ जागा मिळतील. तर महायुतीला ११५ ते १२८ जागांवर यश मिळेल, असं लोकपोलचा सर्व्हे सांगतो. त्यामुळे राज्यात सत्तांतर होण्याची दाट शक्यता आहे.

लोकसभा निवडणुकीत महायुती आणि महाविकास आघाडीला झालेल्या मतदानात फारसा फरक नव्हता. पण विधानसभेला चित्र वेगळं दिसेल असा अंदाज आहे. महायुतीला ३७ ते ४० टक्के मतदान होण्याची शक्यता आहे. तर महाविकास आघाडीला ४३ ते ४६ टक्के मतं मिळू शकतात.



तर अन्य पक्षांना १६ ते १९ टक्क्यांसह ५ ते १४ जागा मिळण्याचा अंदाज वर्तवण्यात आलेला आहे.

लोकसभा निवडणुकीत महायुतीला केवळ १७ जागांवर यश मिळालं होतं. तर मविआनं ३० जागा खिशात घातल्या होत्या. विधानसभा मतदारसंघनिहाय परिस्थिती पाहिल्यास लोकसभेला मविआनं १५३ जागांवर आघाडी घेतली होती, तर महायुती १२७ जागांवर पुढे होती. आता विधानसभेलाही तसाच निकाल लागण्याची दाट शक्यता आहे. लोकपोलच्या सर्व्हेनुसार मविआला १५१ ते १६२ आणि महायुतीला ११५ ते १२८ जागा मिळण्याचा अंदाज आहे.

राज्यात महाविकास आघाडीला पूर्ण बहुमत मिळेल, असं लोकपोलचा सर्व्हे सांगतो. लोकपोलनं महायुती आणि महाविकास आघाडीला किती जागा मिळू शकतात, त्यांना किती टक्के मतदान होऊ शकतं, याची आकडेवारी प्रसिद्ध केलेली आहे. पण लोकपोलनं पक्षनिहाय अंदाज जाहीर केलेले नाहीत. महायुतीत सर्वाधिक फटका अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला आणि मविआला सर्वाधिक नुकसान ठाकरेंच्या शिवसेनेचं होऊ शकतं, असं लोकपोलचं सर्वेक्षण सांगतं. याचा अर्थ लोकसभा निकालाचीच पुनरावृत्ती विधानसभेलाही होईल, अशी दाट शक्यता आहे. प्रत्येक मतदारसंघातील जवळपास ३०० जणांनी बोलून लोकपोलनं सर्व्हे केला आहे. या सर्व्हेत एकूण ८६ हजार ४०० नागरिकांचा सहभाग होता.

# विशाल पाटील अपक्ष खासदार, कोण अधिकृत त्यांना काय माहित - अनिल सावंत

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** पंढरपूर मंगळवेढा मतदार संघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार अनिल सावंत यांनी आज प्रचारार्थ पंढरपूर तालुक्यातील गावांना गाव भेट दौरा आयोजित केला होता. यामध्ये सिद्धेवाडी, तावशी, तनाळी, तपकिरी-शेटफळ, खर्डी गावांचा समावेश होता.

सिद्धेवाडी गावामध्ये दिलेल्या भेटीत उपस्थित मतदारांशी बोलताना अनिल सावंत यांनी सांगलीचे खासदार विशाल पाटील यांचा चांगलाच समाचार घेतला.

काल मरवडे याठिकाणी विशाल पाटील यांची सभा झाली होती. महाविकास आघाडीचे बंडखोर उमेदवार भगीरथ भालके यांच्या प्रचारार्थ काल विशाल पाटील यांनी बोलताना नाव न घेता राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षावर टीका केली होती.

विशाल पाटलांच्या टीकेला उत्तर देताना आज अनिल सावंत यांनी सिद्धापुर गावामध्ये बोलताना त्यांचा चांगलाच समाचार घेतला. अनिल सावंत म्हणाले, काल आपल्या एका मित्र पक्षाच्या उमेदवाराची सभा झाली. या सभेत एक अपक्ष खासदार म्हणाले,

## एक परिचारकांच्या जीवावर आमदार, दुसरे वडिलांच्या जीवावर होण्याचं स्वप्न पाहतायत



महाविकास आघाडीचा अधिकृत उमेदवार भगीरथ भालके हेच आहेत. मला एक गोष्ट कळत नाही. मुळात हा अपक्ष खासदार, आणि यांना महाविकास आघडीचे उमेदवार ठरवण्याचा अधिकारी कोणी दिला. आमचं आम्ही बघून घेऊ ना, अनिल सावंत यांनी विद्यमान आमदार समाधान आवताडे आणि भगीरथ भालके यांच्यावरही खडसून टीका केली. एक परीचारकांच्या जीवावर आमदार झालेत, अन दुसरे वडिलांच्या पुण्याईवर आमदार होण्याचे स्वप्न पाहतायत.

वडिलांच्या जीवावर राजकारणात यशस्वी होण्याचे दिवस आता गेले आहेत.

विद्यमान आमदार सांगतात, तीन हजार कोटींची कामे केली. मात्र पंढरपूर मंगळवेढ्यातील अनेक गावात पायाभूत सुविधांची देखील सोय नसल्याचं वास्तव आहे. मग नक्की तीन हजार कोटी गेले कुठे? कॉन्ट्रॅक्टरच यांचीच लोकं असल्यावर तीन हजार कोटी फक्त कागदावरच दिसणार. अशी जहरी टीका महाविकास आघाडी आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार अनिल सावंत यांनी नाव न घेता समाधान आवताडेंवर केली. यावेळी मा. व्हा. चेअरमन वसंतनाना देशमुख, जिल्हाध्यक्ष ओबीसी सौ. शारदा ताई जाधव, सिद्धापूर गावाचे सरपंच सारंग जाधव, ग्रा.प सदस्य, बाबुराव गोडसे, मा. आप्पा जाधव, सचिन जाधव, विशाल जाधव, विजय जाधव, सुनील जाधव, आदी महाविकास आघाडीचे विविध पदाधिकारी कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपस्थित मतदारांशी बोलताना अनिल सावंत म्हणाले, आतापर्यंत केवळ पाणी आणि रस्त्याच्या प्रश्नावरच निवडणुका लढवल्या गेल्या आहेत. आणखी किती दिवस आपण याच मुद्द्यांवर निवडणुका लढणार आहोत. मला एक संधी द्या, पाणी आणि अंतर्गत रस्त्यांवर पुन्हा निवडणूक लढवण्याची वेळ येऊ देणार नाही.

# माढा मतदारसंघाचा विकासासाठी संधी द्या, संधीचे सोने करून दाखवतो - अभिजीत पाटील

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** घरात कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसताना केवळ जनतेच्या अपार प्रेमामुळे 'विठ्ठल'चा चेअरमन झालो. या काळात ज्या-ज्या जबाबदाऱ्या अंगावर पडल्या, त्या सर्व प्रामाणिकपणे पार पाडल्या आहेत. इथून पुढच्या काळातही प्रगतीची वाट तुमच्यापुढे मांडलेले विकासाचे व्हिजन पूर्ण करण्यासाठी आणि मतदार संघाचा शा श्वत विकास करण्यासाठी संधी द्या, मिळालेल्या संधीचे सोने करून दाखवतो, असे आश्वासन महाविकास आघाडीचे उमेदवार अभिजीत पाटील यांनी दिले.

बुधवारी अभिजीत आबा पाटील यांनी माढा मतदार संघास जोडलेल्या पंढरपूर तालुक्यातील कान्हापुरी, करोळे, जळोली, सांगवी, बादलकोट, नेमतवाडी, पेहे, नांदोरे, आव्हे, तरटगाव, या गावांचा प्रचारदौरा करून सायंकाळी उंबरे व रोपळे येथे जाहीर सभा घेतल्या. उंबरे येथील जाहीर सभेप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी जाधव साहेबांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो ज्येष्ठ नेते नामदेव बापू मुळे, विठ्ठल दादा दगडे ज्ञानेश्वरजी सलगर संभाजीराव कदम, सुरेशन इंगळे, शरद इंगळे,



दादा इंगळे, सत्यवान मुळे, पांडूरंग शिंगटे, शेतकरी संघटनेचे सचिन पाटील, संभाजी ब्रिगेडचे किरण कचरे, नामदेव मुळे, विठ्ठल दगडे, किसन मुळे, विष्णू बागल, जीवराज चव्हाण, नागनाथ कानगुडे, शहाजी मुळे, सत्यवान मुळे, दत्तात्रय नरसाळे, किरण कचरे, विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे संचालक जनक भोसले, संजय विजय पाटील यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी अभिजित आबांनी सांगितले की, एके काळी औदुंबर आण्णांनी उसाचा दर जाहीर केल्याशिवाय राज्यातील एकही कारखानदार दर जाहीर करत नव्हता. त्यांचाच एक छोटासा कार्यकर्ता म्हणून विठ्ठल सहकारी साखर कारखाना ताब्यात घेतल्यानंतर धाडसाने राज्यातील उसाच्या दराची कोंडी फोडली आणि तमाम शेतकऱ्यांना टनामागे साडेतीनशे ते चारशे रुपये जादा मिळवून दिले. परिणामी मागील तीन वर्षात शेतकरी संघटनांना एकही आंदोलन करावे लागले नाही. इथून पुढच्या काळात फूड प्रोडक्ट प्रकल्प उभारून उत्पादित मालाच्या निर्यातीतून शेतीकऱ्यांना परदेशी चलन मिळवून देऊ. सर्वात महत्वाचे म्हणजे सोलापूरसाठी समांतर जलवाहिनीचे काम पूर्ण झाल्याने पुढील काळात उजनीतून नदीला नियमित पाणी सोडले जाणार नाही. ही बाब लक्ष्यात घेऊन नदीवर ठिकठिकाणी दहा मीटर उंचीचे बंधारे बांधून पावसाळ्यात वाहून जाणारे २७ टीएमसी पाणी अडवण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला. याशिवाय राज्य आणि केंद्रशासनाच्या ९३६ योजना तळागाळापर्यंत पोचवणे, बचत गटाच्या माध्यमातून महिलांच्या व्यवसायांना चालना देणे, मतदार संघात सर्वच महापुरुषांचे पुतळे उभारणे, एमआयडीसीच्या माध्यमातून युवकांना रोजगार देणे, दोनच वर्षात सर्व रस्ते पक्के करणे, अशी अनेक विकासकामे करण्याचे आश्वासन त्यांनी दिले,

यावेळी अभिजित आबा पाटील यांनी राज्यात शिवसेना आणि राष्ट्रवादी पक्ष फोडल्याचे जनतेला अजिबात आवडले नसल्याने लोकसभेला महाविकास आघाडीचे बत्तीस खासदार निवडून दिल्याचे सांगून या विजयी खासदारांच्या कार्यक्षेत्रातील १९२ आमदार आघाडीचेच निवडून येणार असल्याचा विश्वास व्यक्त केला. त्यामुळे माढा मतदार संघाचा आवाज विधानसभेत घुमला पाहिजे, यासाठी निवडून देण्याचे आवाहन केले.

माढा मतदार संघात ज्यांनी तीस वर्षे सत्ता भोगली आणि मागील पंधरा वर्षात पंढरपूर तालुक्यातील ४२ गावातील नेते व जनतेच्या पाठिंब्यावर निवडून आले त्या शिंदे परिवाराने आपल्या तालुक्यातील एकाही नेत्याचा कधी माढ्यात सत्कार करतानाचा फोटो आपल्याला पाहायला मिळाला नसल्याचे सांगून त्यानी फक्त मते घेतली पण मान दिला नाही, असे अभिजित पाटील म्हणाले.

# राज्य उत्पादन शुल्क विभाग यांच्या धडक कारवाईमध्ये 2 लाख 92 हजार 500 दंड

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** विधानसभा निवडणूक 2024 पार्श्वभूमीवर राज्य उत्पादन शुल्क विभाग सोलापूर यांची सागर धोमकर विभागीय उपायुक्त पुणे विभाग याच्या निदेर्शानुसार श्रीमती भाग्यश्री पं. जाधव, अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क सोलापूर एस आर पाटील उपअधीक्षक राज्य उत्पादन शुल्क सोलापूर याचे मार्गदर्शनाखाली राज्य उत्पादन शुल्क विभाग सोलापूर यांची सोलापूर शहर व जिल्हयामध्ये दि. 13 नोव्हेंबर 2024 रोजी मौजे मुळेगाव तांडा बक्षी हिप्परगा वरळेगाव तांडा शिवाजीनगर तांडा परिसरात कारवाई करून अवैध हातभटटी दारू निर्मिती केंद्रावर कारवाई करून या कारवाईत एकुण 11 हजार 450 लीटर रसायन 575 लीटर हातभटटी दारू असा एकुण रुपए 7 लाख 14 हजार 995 चा प्रोव्हीबिशन गुन्हयातील मुददेमाल जप्त करण्यात आला.

तसेच या विभागाकडुन अवैध विनापरवाना मद्य पिण्यास परवानगी देण्याऱ्या आठ ढाब्यांवरती कारवाई करून ब्रीथ ॲनलायझर चा वापर करून वैद्यकीय चाचणी नंतर सदर आठ मातोश्री ढाबा, दुर्गा ढाबा होटगी रोड, जयभवानी ढाबा मंगळवेढा रोड, सावजी कोल्ड्रिंक्स, कन्ना चौक, तसेच पंढरपुर कासेगाव येथील साईराजे, महाराजा ढाबा, तारापूर, माढा येथील राणा ढाबा, माळशिरस येथील सावनी ढाबा, यावर कारवाई करून ढाबा मालक व मद्यपी ग्राहकांना मा. न्यायालयासमोर हजर केले असता ढाबा मालकास प्रत्येकी रुपए 25 हजार व मद्यपी ग्राहकांना प्रत्येकी रुपए 3 हजार इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा सुनावण्यात आली असून एकुण रुपए 2 लाख 92 हजार 500 इतका दंड जमा करून घेण्यात आला आहे. तसेच अशा प्रकारे अवैध ढाब्यांवर कारवाई यापुढे अशीच चालू राहणार आहे. परवाना नसणाऱ्या ठिकाणी मद्य प्राशन केल्याने संबंधित जागा मालक व मद्यपी या दोघांवर कारवाई होऊ शकते याची नोंद संबंधितानी घ्यावी.

आचारसंहिता कालावधीमध्ये दि 15 ऑक्टोबर 2024 ते दि. 13 नोव्हेंबर 2024 या कालावधीमध्ये सोलापूर शहर व जिल्हयात एकुण 259 गुन्हे नोंद करण्यात आले असून 257 जणांवर कारवाई करण्यात आली आहे. सदर कालावधीत केलेल्या कारवाईत 91 हजार 230 लीटर गुळमिश्रित रसायन, 7 हजार 788 लीटर हातभटटी दारू, 1 हजार 671 लीटर ताडी, 943 ब.ली. देशी दारू, 618 लीटर विदेशी दारू, 77.97 ब.लीटर बिअर 83.88 ब.ली. बनावट विदेशी मद्य व 59 वाहनासह एकुण 1 कोटी 42 लाख 21 हजार 344 इतका मुददेमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर कारवाई निरीक्षक आर.एम.चवरे, जे.एन.पाटील, ए.व्ही.घाटगे, डी.एम.बामणे पंकज कुंभार, भवड, तसेच दुय्यम निरीक्षक .एस.डी.कांबळे, आर एम कोलते, धनाजी पोवार, समाधान शेळके, सुखदेव सिद, श्रीमती अंजली सरवदे, सचिन गुठे, सहाय्यक दुय्यम निरीक्षक मुकेश चव्हाण, मोहन जाधव, संजय चव्हाण, विजय पवार, गुरूदत्त भंडारी, आनंद जोशी, जवान सर्वश्री आण्णा करचे, नंदकुमार वेळापूरे, शोएब बेगमपुरे, वसंत राठोड, चेतन व्हनंगुटी, इस्माईल गोडीकट, कपील स्वामी, प्रशांत इंगोले, अनिल पांढरे, विनायक काळे, विकास वडमिले, विजय शेळके, योगीराज तोग्गी, तानाजी जाधव, रेवणसिध्द कांबळे वाहनचालक रशीद शेख, दिपक वाघमारे व संजय नवले यांनी पार पाडली.

अवैध मद्यविक्री, अवैध धंदे व वाहतूकी विरोधात कारवाई यापुढेही चालु राहणार असून अवैध मद्याबाबत माहिती असल्यास टोल फ्री 18002339999 क्रमांक अथवा व्हॉटस ॲप क्रमांक 8422001133 या कार्यालयास माहिती दिल्यास माहिती देणाऱ्याचे नाव गुप्त ठेवले जाईल असे श्रीमती भाग्यश्री पं. जाधव, अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क सोलापूर यांनी सांगुन अवैध मद्याबाबतची माहिती कळविण्याचे आवाहन केले आहे.

# हरी नामाच्या गजराने पंढरीनगरी दुमदुमली; कार्तिकी एकादशी सोहळ्याला सुमारे पाच लाख भाविकांची उपस्थिती

पंढरपूर : पंढरपूर - भिडे आसमंती ध्वजा वैष्णवांचीङ्ग उभी पंढरी आज नादावलीङ्गतुझे रूप ओठी तुझे रूप ध्यानीङ्ग जीवाला तुझी आस का लागली ! विठुरायाच्या दर्शनाच्या ओढीने पंढरीत दाखल झालेल्या सुमारे पाच लाख भाविकांच्या हरी नामाच्या गजराने पंढरी नगरी दुमदुमून गेली होती.

कार्तिकी एकादशीला चंद्रभागा नदीमध्ये पवित्र स्नान केल्यानंतर भाविकांना पांडुरंगाच्या दर्शनाची आस लागली होती. मंगळवारी (ता. १२) श्री विठ्ठल दर्शनाची रांग दहा नंबर पत्रा शेडच्या पुढे गेली होती. तर श्रींच्या दर्शनासाठी १६ ते १८ तासांचा अवधी लागत होता.

कार्तिकी एकादशीला चंद्रभागा नदीत स्नान करण्यासाठी



पहाटेपासूनच भाविकांनी अलोट गर्दी केली होती. नदीत स्नानाची पर्वणी साधल्यानंतर बहुतांश भाविक विठुरायाच्या दर्शनासाठी पत्रा शेड दर्शन उभे होते. तर दिंडीतील वारकरी नगरप्रदक्षिणेला निघाले होते.

कपाळी अष्टगंध, बुक्का याचा टिळा, मुखी पुंडलिक वरद हा घोष, खांद्यावर भागवत धमार्ची भगवी पताका व हाती टाळ मृदुंग हा परिवेश धारण करून नगर प्रदक्षिणेला निघालेल्या दिंडीतील भाविकांच्या जयघोषाने पंढरीतील वातावरण भक्तीमय झाले होते. श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसर, प्रदक्षिणा मार्ग व चंद्रभागा नदीचे वाळवंट भाविकांच्या अथांग गदीर्ने फुलून गेला होता.

श्री विठ्ठल मंदिर सभोवतालच्या परिसरामध्ये होणाऱ्या भाविकांच्या अलोट गर्दीवर नियंत्रण मिळवण्यासाठी जिल्हा पोलीस प्रशासनाच्या वतीने यंदा प्रथमच बेरीकेडिंग करण्यात आले होते. श्री संत नामदेव पायरी व पश्चिम द्वार परिसरामध्ये इंग्रजी व्ही. आकाराचे बेरीकीडिंग केल्यामुळे गदीर्चे विभाजन झाल्याचे दिसून आले. त्यामुळे भाविकांना श्री विठ्ठल मंदिराच्या कळसाचे दर्शन व मंदिर प्रदक्षिणा पूर्ण करणे सुलभ झाले होते.

दरम्यान, आम्ही सोमवारी (ता.11) (पान 2 वर..)

# राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाच्या कार्यकारी अध्यक्षपदी न्यायाधीश भूषण गवई यांची निवड

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राष्ट्रपती श्रीमती द्रोपदी मुर्मु यांनी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश श्री. भूषण रामकृष्ण गवई यांची राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाच्या कार्यकारी अध्यक्षपदी निवड करण्यात आलेली आहे, अशी माहिती राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण (NALSA) यांच्याकडून देण्यात आली आहे.

हे नामनिर्देशन आदेश हे 11 नोव्हेंबर 2024 पासून लागू आहे. भारताच्या राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू, यांना विधी सेवा प्राधिकरण कायदा, 1987 च्या कलम 3 च्या खंड (b) द्वारे प्रदान केलेल्या प्राप्त अधिकारांतर्गत सदरचे नामनिर्देशन करण्यात आले आहे. त्यासंबंधीची अधिसूचना कायदा आणि न्याय मंत्रालय, भारत सरकारच्या अधिकृत राजपत्राद्वारे 08 नोव्हेंबर 2024 रोजी प्रकाशित करण्यात आली होती. भारताचे माननीय सरन्यायाधीश, न्यायमूर्ती श्री. संजीव खन्ना हे NALSA प्राधिकरणचे पूवीर्चे कार्यकारी अध्यक्ष होते. तदनंतर कार्यकारी अध्यक्ष हे पद भारताच्या सर्वोच्च न्यायालयातील द्वितीय वरिष्ठ न्यायमूर्ती यांना बहाल केले जात असते.

NALSA चे कार्यकारी अध्यक्ष म्हणून नामनिर्देशन होण्यापूर्वी माननीय न्यायमूर्ती भू. रा. गवई हे सर्वोच्च न्यायालयाच्या विधी सेवा समितीचे (SCLSC) अध्यक्ष होते.

कार्यकारी अध्यक्ष म्हणून माननीय न्यायमूर्ती भू. रा. गवई हे NALSA चे मिशननुसार सर्व नागरिकांना, विशेषतः समाजातील उपेक्षित आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील सर्व नागरिकांना सुलभ आणि मोफत कायदेशीर मदत प्राप्त व्हावी या NALSA मिशनचे नेतृत्व करतील. आर्थिक किंवा सामाजिक अडथळ्यांमुळे कोणत्याही नागरिकाला न्याय नाकारला जाणार नाही याची खात्री करून, कलम 39-अ च्या संवैधानिक आदेशाचे पालन करण्याची NALSA ची वचनबद्धता त्यांच्या नेतृत्वात प्रस्थापित केले जाईल.

# आता मतदारांना घरपोच मिळणार मतदार स्लीप; बीएलओकडून वाटप सुरू

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** सध्या राज्यभरात आगामी विधानसभा निवडणुकांच्या चर्चा सुरू आहेत. राज्यातील मतदार देखील आता आपला मतदानाचा हक्क बजावण्यासाठी सज्ज आहे. मतदानाच्या दिवशी मतदान करायला जाताना मतदाराकडे यादीतील क्रमांक असलेले स्लीप असणे आवश्यक आहे.

त्याचे वाटप प्रत्येक पक्षाकडून केले जाते. त्यावर उमेदवाराचे चिन्ह व फोटो असतात. त्यामुळे ते मतदान केंद्रावर घेऊन जाण्यावर निर्बंध आहेत. त्याच पार्श्वभूमीवर



बीएलओंकडून आता मतदार स्लीप घरोघरी जाऊन वाटपाचे काम सुरू आहे.

मतदानाला जाताना ही मतदार स्लीप सोबत असणे अनिवार्य आहे. यामध्ये नवीन मतदार नोंदणी, मयत, स्थलांतरित मतदारांचा शोध, अशा अनेक कामांकरता प्रत्येक मतदान केंद्रासाठी एक 'बीएलओ' नेमण्यात आले आहे. त्यांच्या माध्यमातून आता मतदानापूर्वी प्रत्येक मतदारांना मतदान स्लीप देण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्याचे वाटप सध्या सुरू असून त्यावर मतदान केंद्राचे नाव आणि क्रमांक तसेच मतदार यादीतील क्रमांक नमूद केलेला असतो. मतदानाला जाताना ही स्लीप सोबत ठेवावी लागते. तसेच या दरम्यान voter helpline app आणि voters.eci.gov.in या संकेतस्थळावरही मतदारांना आपले मतदान केंद्र आणि मतदार यादीतील क्रमांक पाहता येणार आहे.

सध्या राज्यातील अनेक ठिकाणी मतदार स्लीप वाटपाचे काम सुरू आहे. सोलापूर जिल्ह्यात 38 लाख 48 हजार 869 मतदार आहेत. त्या प्रत्येक मतदारांच्या घरोघरी जाऊन मतदानाची स्लीप पोहचवली जात आहे. त्याची जबाबदारी जिल्ह्यातील तीन हजार 723 बीएलओंवर सोपविण्यात आली आहे. जिल्ह्यातील प्रत्येक मतदान केंद्रासाठी एक बीएलओ असून त्याअंतर्गत येणाऱ्या प्रत्येकाला मतदान स्लीप पोचायला हवी, असे निर्देश त्यांना देण्यात आले आहेत. अशाप्रकारे उमेदवाराचे चिन्ह आणि फोटो मतदार स्लीपवर असते म्हणून ते मतदान केंद्रावर घेऊन जाण्यावर निर्बंध आहेत. त्याच पार्श्वभूमीवर बीएलओंकडून आता मतदार स्लीप घरोघरी जाऊन वाटपाचे काम सुरू आहे.

## संपादकीय

# 'मनरेगा'ची चिंता

नवनाथ वारेदेशात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) लागू होऊन सुमारे 18 वर्षे झाली. ग्रामीण अर्थव्यवस्थेवरच्या त्याच्या सकारात्मक परिणामाचे आकलन वेळोवेळी झालेल्या अभ्यासातून निष्पन्न झाले आहे.

'लिबटेक'ने अलीकडेच या योजनेच्या कामगिरीबाबत मांडलेल्या विश्लेषणानंतर 'मनरेगा'वर पुन्हा चर्चा सुरू झाली आहे. यात म्हटले, योजनेनुसार रोजगारांत 2023-24 च्या पहिल्या सहामाहीच्या तुलनेत 2024-25 च्या पहिल्या सहामाहीत 16 टक्के घट झाली आहे. या योजनेत सहभागी होर्णाया कामगारांची संख्या ही मागील वर्षाच्या तुलनेत आठ टक्के घटली आहे. यादरम्यान नोंदणीकृत कामगारांच्या यादीतील नावे 39 लाखांनी कमी झाल्याचे निदर्शनास आले आहे.

या अहवालात पेमेंट प्रणाली (एबीपीएस) मधील अडथळयांचा देखील उल्लेख केला आहे. त्यात म्हटले आहे की, एकूण कामगारांपैकी 24.7 टक्के कामगारांना 'एबीपीएस'च्या माध्यमातून मजुरी मिळत नाही. परंतु ग्रामीण विकास मंत्रालयानुसार, योजनेतील कामगारांच्या कामाचे एकूण दिवस निश्चित केलेले नसतात. कारण योजनेनुसार कामाचे दिवस ठरलेले असतात आणि चालू आर्थिक वर्षातही काम सुरू आहे.त्यांच्या मते, 2006-07 पासून 2013-2014 पर्यंत केवळ 1660 कामगार दिवस झाले तर 2014-15 पासून 2024-25 पर्यंत 2923 कामगार दिवस झाले. यावरून दहा वर्षात खूपच कमी रोजगार वृद्धी झाली आहे. देशातील सक्रिय 99.3 टक्के कामगारांच्या 'आधार'ला देखील ही योजना जोडली गेली. यात अनेक लाभार्थ्यांना चांगल्या रितीने पेमेंट मिळाले आणि यात विलंबाचे प्रमाणही कमी राहिले आहे. श्रमशक्ती सर्वेक्षणाच्या आकडेवारीनुसार, जुलै ते सप्टेंबर 2023 आणि एप्रिल ते जून 2024 या काळात ग्रामीण भागातील हंगामी मजुरांच्या रोजंदारीतील उत्पन्नात 7.7 टक्क्यांनी वाढ झाली. त्याचे श्रेय अर्थातच सरकारच्या 'मनरेगा' सारख्या योजनांना द्यावे लागेल. 2024-25 या काळात किमान सरासरी वेतन दरांत 7 टक्के वाढ नोंदविली गेली. 2024-25 च्या अर्थसंकल्पात या योजनेसाठी 86 हजार कोटी रुपयांचा निधी देण्यात आला आणि ती आतापर्यंतची सर्वाधिक तरतूद आहे. मागील आर्थिक वर्षाच्या तुलनेत ही तरतूद 43.3 टक्के अधिक आहे.

परंतु 2023-24 मधील वास्तविक खर्चाच्या तुलनेत ही तरतूद कमीच आहे. या आर्थिक वर्षात योजनेनुसार 1.05 लाख कोटी रुपये खर्च झाले. अर्थात योजनेला मागणी राहत असेल तर त्यानुसार तरतुदीत वाढ करता येऊ शकते. मनरेगा ग्रामीण भागातील नागरिकांना उत्पन्न आणि उदरनिवार्हाला चालना देणारे सक्षम कल्याणकारी माध्यम राहिले आहे. परंतु रोजगाराच्या शोधात असलेल्या लोकांसाठी हा शेवटचा पर्याय असावा, असे मानले जाते. गेल्या काही महिन्यांत त्याची मागणी कमी झाली. या योजनेसाठीच्या तरतुदीत सातत्याने होणारी वाढ आणि योजनेतील वाढता सहभाग यावरून आपल्या देशाची अर्थव्यवस्था ही पुरेशा प्रमाणात पयार्यी लाभदायी रोजगार निर्माण करू शकत नसल्याचे दिसून येते आणि ही बाब धोरणकर्त्यासाठी चिंतेची आहे. कृषी क्षेत्रातील मनुष्यबळाचे प्रमाण गेल्या काही वर्षात वाढले आहे आणि त्यात घट होऊनही करोनापूर्वीच्या स्थितीवर (2018-19मधील 42.5 टक्के) वर आलेले नाही.वास्तविक 2018-19 मधील आकडा देखील अधिक होता आणि तो मनुष्यबळाच्या स्थितीचे विदारक चित्र दर्शविणारा होता. रोजगार हमी योजना ग्रामीण कुटुंबाला पुरेशा प्रमाणात सुरक्षा प्रदान करते, पण एवढ्या कुटुंबांना मनरेगासारख्या योजनांवर सतत अवलंबून का राहावे लागत आहे? कमी कुशल कामगारांची गरज असलेल्या उद्योगांनी मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती करणे हाच यावरचा तोडगा. या आधारावर कृषी क्षेत्रातून लोक बाहेर पडतील आणि अन्य क्षेत्राकडे वळतील.भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास जगातील सर्व देशांपेक्षा झपाट्याने आणि लक्षणीयरित्या होत असल्याचे ग्राह्य मानले तर त्यातुलनेत देशात रोजगारवाढ का होत नाहीये, हा कळीचा प्रश्न आहे. अनेक अर्थतज्ज्ञ भारताच्या विकासाचे वर्णन रोजगारविहीन विकास असेही करत असतात. बेरोजगारीची आकडेवारी पाहिल्यास या अर्थतज्ज्ञांची हेटाळणी करता येणार नाही. रोजगारवाढ करण्यासाठी कौशल्य विकास करणे गरजेचे आहे. आज गावाखेड्यातील मुलांना इंटरनेट तंत्रज्ञानामुळे जगाची कवाडे खुली झाली आहेत. त्यांच्या आकांक्षा वाढल्या आहेत. त्यांना मनरेगामध्ये मिळर्णाया रोजगाराचे आकर्षण असेल का? रोजगारहमीपेक्षा त्यांना स्थिर, शाश्वत, चांगले वेतन देणारे आकर्षक रोजगार हवे आहेत. त्यासाठीचे कौशल्य देणारे शिक्षण-प्रशिक्षण हवे आहे. पुढील 25 वर्षासाठीची योजना आखताना केवळ अर्थव्यवस्थेचे आकारमान वाढवून चालणार नाही, तर रोजगारक्षमता आणि कौशल्य विकसन वाढणे, त्यातून बेरोजगारीचा आलेख नीचांकी पातळीवर आणणे, गरिबीचे प्रमाण घटणे आणि सामाजिक विषमता कमी होणे गरजेचे आहे. भारताला आपले दरडोई उत्पन्न वाढवणे, महागाईचा दर कमी करणे, सामाजिक विषमता कमी होणे, गरिबीचे उच्चाटन, शिक्षण-कौशल्य-आरोग्य या तिन्ही क्षेत्रांमध्ये भरीव प्रगती करणे, महिलांचा आर्थिक विकासातील सहभाग आणि योगदान वाढवणे यांसह अन्य अनेक गोष्टींची गरज आहे.मनरेगाच्या माध्यमातून गावात समृद्धी निर्माण करणे शक्य आहे; पण प्रश्न आहे तो बदलत्या आर्थिक-सामाजिक वातावरणाचा आणि उंचावत चाललेल्या आशाआकांक्षांचा, गरजांचा! त्यादृष्टीने धोरणकर्त्यांनी विचार करावा इतकेच! 'संपर्क' संस्थेनुसार, गेल्या पाच वर्षात राज्यातील एकूण ग्रामीण कुटुंबसंख्येच्या जास्तीत जास्त 20 टक्के कुटुंबांनी मनरेगावर काम केले आहे.याच काळात प्रत्येक कुटुंबाला सरासरी प्रती वर्षी 37 ते 47 एवढेच दिवस काम मिळाले आहे. म्हणजेच एका वर्षात या कुटुंबांनी सरासरी 8,945 ते 12,267 एवढी रक्कम मजुरीतून कमावलेली आहे. ही समाधानकारक आणि पुरेशी आहे असे मानायचे का? याला 'मनरेगा'चे यश म्हणायचे का?

# गुरू नानक देव

आज कार्तिक पौर्णिमा, आज शीख समुदायाचे लोक श्री गुरू नानक देवजी यांचा जन्मोत्सव साजरा करतात. वास्तविक श्री गुरु नानक देवजी यांचा जन्म १५ एप्रिल १४६९ रोजी झाला मात्र शीख धमार्चे अनुयायी त्यांचा जन्मोत्सव कार्तिक पौर्णिमेलाच साजरा करतात. गुरू नानक देवजी हे शीख धमार्चे संस्थापक व पहिले गुरु होते. गुरू नानक देवजी यांचा जन्म पाकिस्तानातील लाहोर जवळील तलवंडी येथे एका हिंदू कुटुंबात झाला. आजही या गावाला नानकना साहिब असे म्हणतात. गुरू नानक यांचा जन्मोत्सव प्रकाश पर्व म्हणूनही साजरा केला जातो. गुरू नानक देव लहानपापासूनच धार्मिक वृत्तीचे होते मात्र कर्मकांड आणि बुरसटलेले विचार त्यांना मान्य नव्हते म्हणूनच त्यांनी मौजीबंधनाच्यावेळीच जानवे घालण्यास नकार दिला होता होता. हिंदू धमार्तील कर्मकांड, बुरसटलेले विचार, अनिष्ट चालीरीती, विषमता, जातीभेद, स्त्रियांना दिली जाणारी हिन वागणूक त्यांना मान्य नव्हती म्हणूनच ज्ञान प्राप्तीनंतर त्यांनी शीख धमार्ची स्थापना केली. शीख धर्माच्या प्रचार आणि प्रसारासाठी त्यांनी जगभर यात्रा काढली. या दरम्यान त्यांनी जगभरातील अनेक धार्मिक स्थळांना देखील भेटी दिल्या. त्यांनी त्या काळात केवळ भारतातीलच धार्मिक स्थळांना नव्हे तर इराक मधील बगदाद आणि सौदी अरेबियातील मक्का मदिना या धार्मिक स्थळांनाही भेटी दिल्या. या दरम्यान त्यांनी शीख धर्माच्या तत्वांचा प्रसार आणि प्रचार केला. सर्वसामान्यांमध्ये देव आणि धमार्बाबत जागृती निर्माण करण्यासोबतच त्यांनी हिंदू मुस्लिम एकतेचा संदेशही दिला. त्यांनी स्थापन केलेला शीख धर्म उदात्त, समतेच्या शिकवणुकीमुळे केवळ भारतातच नव्हे तर जगभरात रुजला. आज शीख धमार्चे अनुयायी केवळ आशिया खंडातच नाही तर युरोप आणि अमेरिका खंडातही आहे. जगातील प्रमुख धर्मा पैकी एक धर्म म्हणून शीख धर्म ओळखला जातो. गुरू नानक यांची मानवतावादावर दृढ श्रद्धा होती. त्यांचे चिंतन धर्माच्या सत्य आणि शाश्वत मूल्यांचे मूळ होते म्हणूनच जात धर्म यापलीकडे जाऊन सर्वांनी एकत्र यावे, माणूस म्हणून एकत्र राहावे अशी त्यांची इच्छा होती. सर्व माणसे ही एकाच आईची लेकरे असून त्यांच्यात कोणीही उच्च नीच नाही असे ते मानत. जातीपाती मधील धर्मा धर्मामधील भेदभाव तर मान्य नव्हता. कोणीही हिंदू नाही, कोणीही मुसलमान नाही सर्व जण मानव आहोत असा नारा त्यांनी दिला. त्यांनी एकता, श्रद्धा आणि प्रेमाचे तत्वज्ञान मांडले. ते क्रांतिकारक विचारांचे होते. त्यांच्या विचारांमुळेच शीख धर्म साता समुद्रापार गेला. ७ सप्टेंबर १५३९ रोजी श्री गुरु नानक देवजी यांचे महानिर्वाण झाले. गुरू नानक देवजी यांना त्यांच्या जयंतीदिनी विनम्र अभिवादन!



श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# ग्रामीण भागातील विकास कामाला महत्व देणार - सरपंच ऋतुराज सावंत

**सोलापूर (कटूसत्य वृत्त)**:- महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार अनिल सावंत यांच्यावर विश्वास दाखवून पंढरपूर तालुक्यातील कौठाळी येथील इनामदार वस्ती येथील शिवाजी नागटिळक यांच्यासह मुस्लिम समाजातील 100 युवक कार्यकर्त्यांनी महाविकाच्या आघाडीचे उमेदवार अनिल सावंत यांना जाहीरपणे पाठिंबा देत युवक नेते वाकवचे सरपंच ऋतुराज सावंत, रवी सावंत यांच्या उपस्थितीत जाहीर प्रवेश केला



शरद पवार साहेबांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही सर्वजण काम करत आहोत. अनिल सावंत आमदार झाले की दुष्काळी भागात.महाविकास आघाडीने पंचसूत्री योजना राबविण्यात येणार आहे. त्यामध्ये कृषी समृद्धी अंतर्गत शेतकऱ्यांना 3 लाखापर्यत कर्जमाफी देण्यात येणार आहे. तसेच नियमित कर्ज फेडीसाठी 50,000 रु प्रोत्साहनराज्यातील सर्व नागरिकांना मोफत औषध व कुटुंब रक्षण 25 लाखांपर्यंत आरोग्य विभागामार्फत मोफत देण्यात येणार आह. अनिल सावंत यांना आमदार करून आपण विधानसभेत पाठवावे, आमदार झाल्यानंतर या मतदारसंघात एकही प्रश्न शिल्लक राहणार नाही वाकाव सरपंच ऋतुराज सावंत यांनी सांगितले. यावेळी, आम आदमी पार्टीचे जिल्हाध्यक्ष एम पाटील, आधी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# थोर व्यक्तीविषयक रूढीभंजनाचे । ध्येय नानकांचे

प्रबोधन

महात्मा गौतम बुद्ध, बसवेश्वर, चक्रधर यांनी जशी रूढ धमार्ची बंधनं तोडून नवी जीवन पद्धती स्वीकारली; नवधर्म स्थापन केले. त्याचप्रमाणे थोर मानवतावादी, महान चिंतनशील गुरुनानक (जन्मः १४६९; मृत्यूः १५३९) यांनी आपल्या जीवनानुभवातून रूढ, पक्षपाती, माणुसकीहीन धर्माचे जाच, काच आणि त्रास दूर सारून मानवजातीच्या हितवृद्धीसाठी जी नवी, समर्थ, टवटवीत, समतामूलक आचार-विचारसरणी आपल्या समाजबांधवांना अर्पण केली, ती म्हणजे शीख धर्म. पंजाबचे एक सुपुत्र, साहित्यिक कर्तारसिंग दुग्गल म्हणतात, 'जगातील प्रमुख धर्मात शीख धर्म हा सर्वात आधुनिक आणि शास्त्रीय धर्म आहे.' हा धर्म बुद्ध आणि जैन धर्माप्रमाणे निरीश्वरवादी आहे. मूर्तिपूजा या धर्मांना मान्य नाही. कर्मकांडात ते गुरफटत नाहीत. हिंदू धर्माप्रमाणे जातींची उतरंड लावून माणुसकीला मुकण्याचं दुष्कृत्य ते करीत नाहीत. शिवाय गुरुनानक यांनी शांततापूर्ण सहजीवनाचा जो उपदेश हिंदू-मुसलमान दोघांनाही केला, तो राष्ट्रोन्नतीसाठी खूपच सहाय्यकर्ता झाला. जवाहरलाल नेहरू म्हणतात, 'उत्तरेकडे शीखांचे धर्मसंस्थापक गुरुनानक हे उदयास आले. त्या पंथापुरतीच त्यांची शिकवण मर्यादित राहिली नव्हती, तर ती पंथातीत होऊन सर्व जनतेत पसरली. या नवीन विचारांचा हिंदू-मुसलमान दोन्ही धर्मांवर परिणाम होऊन त्यांच्यात बदल झाला. '

गुरुनानकांच्या वेळी मोगल घराण्याचा संस्थापक बाबर या सुलतानाने विध्वंसपूर्ण कृत्यं केली. आपल्या डोळ्यांसमोर घडलेल्या ह्या समाजपीडेने नानक त्रस्त झाले. बाबराच्या ह्या क्रौयार्चा निषेध करून ईश्वरी न्यायाविरुद्ध त्यांनी बंड पुकारलं. त्यांनी ईश्वराला जाब विचारला, 'अशा प्रकारच्या यातना आणि अशा प्रकारचा आक्रोश या गोष्टींचं तुला थोडसंही दुःख झालं नाही काय?' अन्यायी राजवट आणि त्याच्या प्रेरक शक्तीला एकाच वेळी जाब विचारण्याचं असाधारण नैतिकबल गुरुनानक त्यांच्या स्वभावात मुळातच होतं. म्हणूनच राष्ट्रसंत तुकडोजींनी त्यांचं श्रेष्ठत्व वर्णन करताना म्हटलं, 'साडेचारशे वर्षापूर्वी झालेले गुरुनानकदेव हे शीखांचे पहिले धर्मगुरू. गोपालन, दुकानदारी व सरकारी नोकरी जनसेवेत खर्ची घालून सन्नामाच्या सतारीवर मानवतेची मधुर भजनं गात संपूर्ण भारत, लंका, इराण व अरबस्थानातही फिरले. जात पात पूछे नही कोय। हरि को भजे सो हरि का होय म्हणून जातिपंथधर्म भेदांचं निवारण करत ते मशिदीत नमाज पढले व डाकूंनाही त्यांनी सुधारलं. आपली गुरुगादी त्यांनी मुलाऐवजी शिष्यास दिली. ' आपल्या देश-विदेश पर्यटनात ते जगन्नाथपुरी येथे गेले असता तेथे होणाऱ्या पूजेचं आणि आरतीचं कर्मकांड त्यांना आवडलं नाही. त्यांनी जगन्नाथाच्या वैश्विक आरतीची भव्य कल्पना शब्दबद्ध करून गायला सुरुवात केली. आकाशाच्या तबकात, सूर्यचंद्रांची निरांजनं ठेवून, तारकांच्या मोत्यांनी ते सजवून केली जाते ती खरी आरती. वाऱ्याच्या चवऱ्या ढाळणारी पुष्पवने ही खरी आरती. गुरुनानकांचे विचार ऐकून पुजारी आणि भाविकजन सद्गदित झाले, धन्य झाले. त्यांच्या मनाला व्यापकता आणि चिंतनाला अथांग खोली प्राप्त झाली. गुरुनानक हे असे विश्वव्यापक व्यक्तिमत्त्व होते. मक्केच्या प्रवासाने त्यांना खूप थकवा आला होता. गलितगात्र होऊन ते पडले आणि झोपी गेले. रूढीनुसार काबाकडे त्यांचं डोकं असण्याऐवजी पाय होते. धर्मभावना दुखावलेल्या पहारेकऱ्याने त्यांना त्याबद्दल जाब विचारल्यावर नानक म्हणाले, 'ज्या दिशेला ईश्वर नाही, तिकडे माझे पाय कृपा करून ठेव.' या प्रसंगातून पहारेकऱ्यांचं प्रबोधन झाले. त्याने गुरुनानक यांची क्षमा मागितली.

एकदा सैदपुराला त्यांनी भेट दिली, तेव्हा भाई लाला नावाच्या सुताराच्या घरी राहिले. मलिक भागो हा सैदपूरचा शहरप्रमुख आणि धनाढ्य होता. त्याने गुरुनानक यांना मेजवानीचं निमंत्रण दिलं. ते नाकारून गुरुनानकांनी आपल्या सुतार भक्ताची भाजी-भाकरी पसंत केली. मलिक भागो खवळला. त्यावर गुरुनानक म्हणाले, 'गैरमागार्ने गेल्याखेरीज धन जमवता येत नाही म्हणून श्रीमंताचं अन्न मी घेत नाही.' गुरुनानक हे रूढीभंजक अर्थात, रूढीमध्ये अडकणारे नव्हते. त्यांच्या मुंजीच्या वेळी पुरोहिताने त्यांना जानवं घालण्याचा केलेला रूढीनिष्ठ आग्रह धुडकावून त्यांनी जानवं घालण्यास विरोध केला. जानव्याबद्दलचं त्यांचं चिंतन मार्मिक आहे. नानक म्हणतात, 'दयेच्या कापसापासून समाधानाचा धागा काढा. त्याला सत्याचा पीळ द्या. संयमाची गाठ मारा. असं जानवं कधी तुटत नाही, मळत नाही. असे जानवं धारण करणारे धन्य होत.'

ईश्वराच्या ठिकाणी ग्रंथाची पूजा करणारा शीख धर्म हा जगातील सर्व धमार्पेक्षा निःसंशय सर्वश्रेष्ठ आहे. आधुनिकतेचा प्रारंभ जर ग्रंथापासून होत असेल, तर त्या दृष्टीने शीख धर्म हा आद्य धर्म होय. ग्रंथ हेच गुरू हा विचार या धमार्ने सर्वाथार्ने सिद्ध करून दाखवला आहे. कर्तारपूर येथील वास्तव्यातच गुरुनानक यांनी गुरू का लंगर अर्थात सहभोजनाचा प्रारंभ करून जातिभेद, वर्णभेदाचा अंत केला. २२ नोव्हेंबरला 'गुरुनानक जयंती' आहे. स्वतःचा उल्लेख 'सेवक नानक' विनम्र असा करणारे गुरुनानक हे काळाच्या पुढे झेपावणारे आणि जगातील सर्वांना आपले मानणारे थोर विभूती होते. कारण त्यांनी-

देवांच्या ठिकाणी । ग्रंथ स्थापियले ।
नानकांनी केले । ज्ञाना थोर ॥१
शीख धर्म श्रेष्ठ । सर्व धमार्हून ।
जाती-अभिमान । नाही तेथे ॥२
धमार्धांना दिली । धमार्तीत दृष्टी ।
मानवता सृष्टी । उभी केली ॥३
सहभोजनाचा । नवा उपक्रम ।
लंगर हा धर्म। जातिनाशी ॥४
हिंदू नाही कोणी । कोणी मुसलमान ।
अवघे समान । पृथ्वीवर ॥५
श्रीमंतांनी धन । समाजाला द्यावे ।
दीनबंधू व्हावे । समाजात ॥ ६
रूढीभंजनाचे । ध्येय नानकांचे ।
सत्यपूजनाचे । थोर कार्य ॥७



**जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

# अकलूज नगरपरिषद, रोटरी क्लब अकलूज व रोटरी क्लब सराटी डिलाईट यांच्या संयुक्त विद्यमाने रन फॉर वोट स्पर्धेचे आयोजन

अकलूज (कटूसत्य वृत्त):- आगामी विधानसभा निवडणूक-2024 चे मतदान 20 नोव्हेंबर 2024 रोजी पार पडणार आहे.सदरील दिवशी जास्तीत जास्त नागरिकांनी मतदानाचे पवित्र कर्तव्य पार पाडून मतदानाची टक्केवारी वाढावी याकरिता मा.निवडणूक आयोग यांचे निदेर्शानुसार प्रशासन विविध उपक्रमांद्वारे जनजागृती करीत आहे. या अंतर्गतच 254-माळशिरस विधानसभा(अ. जा.) मतदारसंघांमध्ये अकलूज नगरपरिषद,रोटरी क्लब अकलूज व रोटरी क्लब सराटी डिलाईट यांनी ह्यफ्ब्ठ ऋङ्घफ श्डळएह्ल या स्वरूपाची मॅरेथॉन स्पर्धा आयोजित करून मतदान जनजागृती चा अभिनव उपक्रम राबविला.सदरील ह्यफ्ब्ठ ऋङ्घफ श्डळएह्ल मॅरेथॉन स्पर्धा अकलूज येथील विजयसिंह मोहिते पाटील क्रीडा संकुल येथे दिनांक 14 नोव्हेंबर 2024 रोजी सकाळी ०७.०० वाजता आयोजित करण्यात आली होती.सदरील मॅरेथॉन ही सर्व वयोगटातील नागरिकांकरीता होती.या अंतर्गत मुलींकरिता ०३ कि.मी.धावण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असता त्यामध्ये एकूण १८ मुलींनी सहभाग नोंदविला होता. तसेच



पुरुषांकरिता ०५ किमी धावण्याचे उद्दिष्ट ठेवले असता यामध्ये एकूण ६२ मुले व नागरिक सहभाग घेतला विशेष म्हणजे ७ वर्षाची २ मुले यांनी ०३ किमी धावून मॅरेथॉन पूर्ण केली. यामध्ये अकलूज परिक्षेत्राचे पोलीस उपविभागीय अधिकारी नारायण शिरगावकर साहेब यांनी देखील मॅरेथॉन धावण्याचा आनंद घेतला. मॅरेथॉन मध्ये सर्व सहभागी स्पर्धकांना मा. निवडणूक निर्णय अधिकारी विजया पांगारकर यांचेमार्फत प्रमाणपत्र देऊन तसेच विजेत्यांना बक्षीस देऊन गौरवण्यात आले. यावेळी सर्व उपस्थित नागरिकांनी लोकशाहीवर निष्ठा ठेवून, लोकशाही परंपराचे जतन करण्याचे तसेच निःपक्षपाती व शांततापूर्ण वातावरणातील निवडणुकांची पावित्र्य राखण्याची तसेच कोणत्याही प्रलोभनास अथवा दबावास बळी न पडता मतदान करण्याची शपथ घेतली. यावेळी धनशैल्य विद्यालय, गीरझनी व किडझी स्कूल, अकलूज या शाळेतील तीन ते पाच वर्षे वयोगटातील मुलांनी मतदान जनजागृतीचे पथनाट्य सादर केले.यामध्ये लहान मुलानमार्फत मतदान करताना कोणत्याही आर्थिक प्रलोभना बळी न पडण्याचे आवाहनाणे उपस्थित भारावून गेले. या कार्यक्रमाचे आयोजनामध्ये अकलूज नगरपरिषदेचे मा.मुख्याधिकारी व नोडल अधिकारी स्वीप - दयानंद गोरे साहेब व रोटरी क्लब अकलूज अध्यक्ष प्रिया नागणे,सचिव मनीष गाकवाड, रोटरी क्लब सराटी डिलाईटचे अध्यक्ष श्री.जगदीश कदम,सचिव महादेव पाटील यांनी नियोजन केले. तसेच अकलूज नगरपरिषद कर्मचारी व रोटरी क्लबचे सदस्य यांनी कार्यक्रम सुरळीत पार पाडण्याकरिता विशेष प्रयत्न केले.

# मतदान जनजागृती बाबत स्वीपचे कार्य कौतुकास्पद - सदाशिव पडदुणे

**सोलापूर (कटूसत्य वृत्त)**:- " **SVEEP** उपक्रमांचा उद्देश मतदारांना नैतिक मतदानाबाबत उपलब्ध असलेल्या विविध ऑनलाइन, ऑफलाइन सुविधा जसे की मतदान कसे करावे, निवडणुकीदरम्यान होणाऱ्या भ्रष्ट व्यवहारांना आळा घालण्यासाठी निवडणूक यंत्रणेला कशी मदत करावी इत्यादी माहिती देणे आहे. सर्वसामान्य मतदारांच्या जागृतीसाठी रश्एएढ उपक्रम महत्वाचे आहेत. सर्वच मतदार संघात मतदान जनजागृती बाबत स्वीपचे कार्य कौतुकास्पद,सोलापूर शहर मध्य परिसरातही उत्तम प्रतिसाद मिळत आहे."असे प्रतिपादन निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (सोलापूर क्र. १ ) सदाशिव पडदुणे यांनी केले. ते २४९ सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघाच्या स्वीपच्या कायार्संबंधीच्या बैठकीत आढावा घेताना बोलत होते. याप्रसंगी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी निलेश पाटील,अतिरिक्त सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी समीर यादव यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते.

२४९ शहर मध्यसाठी असलेल्या कर्मचाऱ्यांनी आपले काम नियमि करून जनजागृती करण्याचे काम सुरू केले आहे. वेगवेगळ्या उपक्रमांतर्गत पथनाट्य, वेगवेगळ्या आस्थापनांना भेटी देणे, रिक्षाच्या माध्यमातून प्रबोधन, विद्यार्थी संवाद, पालक संवाद आणि मतदारांशी संवाद साधून स्वीप अंतर्गत उत्तम काम होत असल्याचे निदर्शनास येत आहे.चला मतदान करूया, उज्वल भविष्य घडवूया.मतदार राजा जागा हो, लोकशाहीचा धागा हो. अशा वेगवेगळ्या घोषणा याच्या माध्यमातून मतदार जनजागृती चे काम सुरू आहे.यावेळी मतदार जनजागृतीच्या फलकाचे अनावरण केले. याप्रसंगी नायब तहसीलदार सुधाकर बंडगर,अविनाश गोडसे, प्रमुख भरारी पथक दत्तात्रय गायकवाड, विद्या जाधव, संतोष माने, बळवंत नरोटे, दर्याप्पा कुंभा,र समीना शेख,अब्दुल कुरेशी, मैना घुमरे, सागर स्वामी, सुरेश बामणे, सुनील मुंडे, संतोष पवार, सुनील जाधव, अश्विनी माने आदी उपस्थित होते.

**SVEEP** हा भारतातील निवडणूक आयोगाचा मतदार शिक्षण, मतदार जागृती आणि मतदार साक्षरतेचा प्रसार करण्यासाठी प्रमुख कार्यक्रम आहे. हा एक बहु-हस्तक्षेप कार्यक्रम आहे जो नागरिक, मतदार आणि मतदारांना निवडणूक प्रक्रियेबद्दल शिक्षित करण्यासाठी आणि त्यांच्या माहितीपूर्ण सहभागाला प्रोत्साहन देण्यासाठी विविध माध्यम आणि माध्यमांद्वारे पोहोचतो. रश्एएढ ची रचना राज्याच्या सामाजिक-आर्थिक, सांस्कृतिक आणि लोकसंख्याशास्त्रीय प्रोफाइल तसेच निवडणुकीच्या मागील फेऱ्यांमधील निवडणूक सहभागाच्या इतिहासानुसार केली आहे. आयोग अनेक मतदार जागृती साहित्य तयार करतो आणि संवादाच्या विविध माध्यमे/प्लॅटफॉर्मद्वारे जसे की प्रिंट मीडिया, इलेक्ट्रॉनिक मीडिया, सोशल मीडिया इत्यादींद्वारे त्याचा प्रसार करतो.

मतदार जनजागृतीच्या फलकाचे अनावरण करताना निवडणूक निर्णय अधिकारी सदाशिव पडदुणे, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी निलेश पाटील, अतिरिक्त सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी समीर यादव, अविनाश गोडसे, प्रमुख भरारी पथक दत्तात्रय गायकवाड, संतोष पवार, सुनील जाधव आदी

पान १ वरून

## हरी नामाच्या गजराने..

सायंकाळी चार वाजता नऊ नंबरच्या पत्रा शेडमध्ये उभे होतो. तब्बल १८ तासानंतर मंगळवारी सकाळी श्री विठ्ठलाचे दर्शन प्राप्त झाल्याचे एका भाविकाने सांगितले. तर मुखदर्शनाची रांग प्रदक्षिणा मार्गावरील तानाजी चौकाचाही पुढे गेली होती. मुखदर्शनासाठी सुमारे दीड ते दोन तासांचा अवधी लागत होता.

श्री विठ्ठल मंदिराला फुलांची आकर्षक सजावट कार्तिकी यात्रा सोहळ्यानिमित्त विठ्ठल मंदिराला आकर्षक फुलांच्या सजावटीनं सजविण्यात आले होतं.

'विठ्ठल आमचे जीवन' या थीमवर आधारित मंदिराला केलेली सजावट व फुलांच्या सजावटीमध्ये तयार केलेली श्री विठ्ठल रुक्मिणीची प्रतिमा पाहून भाविक आनंदीत झालेले दिसून आले.

पुणे येथील भक्त राम जांभूळकर यांनी विठुरायाच्या गाभाऱ्याला आकर्षक फुलांची सजावट केली होती.

# सत्तास्थापनेच्या स्पर्धेत मविआ आघाडीवर-हेमंत पाटील 'ग्राउंड लेव्हल'वर तुतारी, मशाल ची चर्चा

**मुंबई (कटूसत्य वृत्त)**:- पुरोगामी राज्य अशी ओळख असलेल्या महाराष्ट्राने गत पाच वर्षामध्ये राजकीय पक्षांची शकले पडतांना बघितले. सुसंस्कृत राजकारणाची मुर्हूतमेढ रोवणाऱ्या राज्यात रसातळाला गेलेल्या राजकारणामुळे यंदाच्या निवडणुकीत मतदार बराच 'सायलेंट' आहे. त्यांनी कुठल्या पक्षांला यंदा सत्तेत आणायचे हे ठरवले आहे. अशात सत्तास्थापनेच्या स्पर्धेत मविआ आघाडीवर आहे, असा दावा इंडिया अगेन्स्ट करप्शनचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि ओबीसी नेते हेमंत पाटील यांनी गुरूवारी (ता.१४) व्यक्त केले.

८३ व्या वर्षी देखील शरद पवार प्रचाराच्या निमित्ताने पुन्हा एकदा महाराष्ट्र पिंजून काढत आहेत. उद्धव ठाकरे देखील त्यांच्यासोबत झालेला 'दगाफटका' जनता दरबारात मांडून मतांचा जोगवा मागत आहेत. अशात ग्राउंड लेव्हलवर तुतारी आणि मशालचीच चर्चा सुरू असल्याचे पाटील म्हणाले. अनेक भागांमध्ये भाजपच्या उमेदवारांचे पारडं जड आहे. परंतु, पवार-ठाकरेंच्या बाजूने एक 'सायलेंट भावनिक लाट' बघायला मिळत आहे. या लाटेत काँग्रेसला थेट फायदा होईल, असा दावा पाटील यांनी केला.

## वात्रटिका

### बॅगा तपासणी

ज्यांना जसे हवे त्यांनी
खुशाल उघडून बघा...
कपड्यांच्याच असतात
आमच्या सोबत बॅगा...
तुमची तपासली तशी
आमची तपासून घेतली...
सर्वांना सारखीच पुन्हा
एकदा वागणूक दिसली...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स (0217)2605091 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone-0217-2605091 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# विकासकामांच्या जोरावर विजयाची हॅट्रिक साधणार



सोलापूर (कटूसत्य वृत्त):- केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून मागील १० वर्षात केलेल्या विकासकामांच्या माध्यमातून दक्षिण सोलापूरच्या झालेल्या विकासाच्या जोरावर आपण या विधानसभा निवडणुकीत नक्कीच हॅट्रिक करू, असा विश्वास आमदार सुभाष देशमुख यांनी व्यक्त केला.विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आमदार सुभाष देशमुख यांनी सोमवारी व मंगळवारी शहर आणि आणि ग्रामीण भागातील विविध ठिकाणी भेटी दिल्या. यामध्ये अमृत नगर, गंगाधर नगर, म्हाडा कॉलनी, ओमगर्जना चौक,ग्रामीण भागातील वांगी, वडकबाळसह अनेक ठिकाणी कॉर्नर बैठका घेतल्या.यावेळी आमदार सुभाष देशमुख यांनी भाजपच्या कार्यकर्त्यांशीही संवाद साधला. कार्यकर्त्यांनी मला केवळ आता आठ दिवस द्यावे त्यानंतर मी कार्यकर्त्यांसाठी पूर्ण पाच वर्ष सेवा करणार आहे, असे सांगत आ. देशमुख यांनी कार्यकर्त्यांना प्रचार यंत्रणा कशी राबवावी, त्याचे नियोजन कसे करावे आणि प्रत्येक बुथवर जास्तीत जास्त मतदान कसे करून घ्यावे याबद्दल मार्गदर्शन केले.

पवार, नरसिंह गुमटे, रवी सरमाळकर, शांताबाई शिंदे, प्रणव कुलकर्णी,उज्वला पाटील, छाया जाधव आदी उपस्थित होते. गंगाधर नगर येथे अॅड. हेमंत माळी, अॅड. मचाले, अॅड. कोणापुरे, अॅड. लोंढे, अॅड. मंजुनाथ

कक्कलमेळी, अॅड. टाकळीकर, अॅड.स्नेहा सरभी तसेच सोसायटीचे सर्व सभासद, महिला, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिवयोगी नगर सोसायटी येथील सोसायटीतून मोठ्या मताधिक्याने सुभाष देशमुख यांना निवडून आणण्याचा निर्धार करण्यात आला.याप्रसंगी देवानंद चिलवंत, विशाल गायकवाड, संगीता जाधव,सोसायटीच्या अध्यक्षा पाटील, डॉ.अमृतनगर येथे नंदू पाटील, किशोर सोळसे, हचडे, वळसंग तसेच सोसायटीचे सर्व सभासद, महिला, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. म्हाडा कॉलनी येथील बैठकीस आनंद बिराजदार, शिवराज सरतापे,विशाल गायकवाड, संगीता जाधव,हेमंत पिंगळे, मधुसूदन जंगम, महेश देवकर व नागरिक उपस्थित होते.वांगी येथील कॉर्नर बैठकीप्रसंगी तालुकाध्यक्ष संगप्पा करके, शामराव हांडे, राहुल पुजारी, सुनील व्हनमाणे व ग्रामस्थ उपस्थित होते. आमदार सुभाष देशमुख यांनी वडकबाळ या गावी भेट देऊन नागरिकांना विकासासाठी महायुतीला साथ देण्याचे आवाहन केले.यावेळी होगेप्पा पुजारी, सिद्धप्पा बिराजदार, परसप्पा गडदे, सुनील व्हनमाने, विलास राठोड व ग्रामस्थ उपस्थित होते.

# भवानी पेठ,शाहीर वस्तीमध्ये तुतारीचा आवाज



सोलापूर (कटूसत्य वृत्त):- सोलापूर शहर उत्तर मतदारसंघात विधानसभा निवडणुकीची चुरस वाढली असून महाविकास आघाडीचे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार महेश कोठे हे तुतारी चिन्हावर निवडणूक लढवत आहेत. भाजपच्या बालेकिल्ल्यात कोठे यांच्या पदयात्रांना मोठी गर्दी होत आहे. त्यामुळे कोठे यांच्या कार्यकर्त्यांचा उत्साह वाढला आहे.

बुधवारी सकाळी प्रभाग तीन मध्ये महेश कोठे यांची पदयात्रा निघाली. यावेळी हजारोंच्या संख्येने नागरिक पादयात्रेत सहभागी झाले होते. ठिकठिकाणी कोठे यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले.

वीस वर्षाच्या खुंटलेल्या विकासामुळे आम्ही महेश कोठे यांच्यासोबत असून मोठ्या मताधिक्याने निवडून देण्याचा निर्धार बीआरएसचे नागेश वल्याळ यांनी व्यक्त केला. मागील चार टर्मपासून आ. विजयकुमार देशमुख यांनी कोणतेही काम केले नाही. साधी मिरची कांडप मशीन आणू शकले नाहीत, पालकमंत्री आणि मंत्री असतानाही कोणतेच ठोस काम झाले नसल्याचा आरोप त्यांनी केला. देशमुख यांनी बालेकिल्ल्याच्या नावावर या भागातील लोकांची वीस वर्षे फसवणूक केली.

त्यामुळे आता लोकांनी ठरवले आहे. यंदा शहर उत्तरमध्ये बदल दिसणार आणि मोठया मताधिक्याने जनता मला निवडून देईल, असा विश्वास महेश कोठे यांनी व्यक्त केला.

यावेळी माजी नगरसेवक सुरेश पाटील, मनोहर सपाटे, विजय साळुंखे,

दशरथ गोप, उदय चाकोते, सुदिप चाकोते, मधुकर आठवले, केदार उंबरजे, सिध्दू बावकर, युवराज सरवदे, भिमाशंकर अंकाराम, सुरेश बिद्री, अक्षय वाकसे, बिपीन पाटील, सुरज पाटील, समीर पांडगळे, महेश बिराजदार, नरसिंगराव येमुल, वासुदेव इप्पलपल्ली, शशीकांत कैंची, संदिप महाले, शंभय्या वडलाकोंडा, नागेश दासरी, प्रविण बतुल, विठ्ठल कोटा, प्रभाकर गुडेली, नरेश काशेट्टी आदींसह नागरिक मोठया संख्येने पदयात्रेत सामील झाले होते.

# कुरूहिनशेट्टी समाजाचा देवेंद्र कोठे यांना पाठिंबा



सोलापूर (कटूसत्य वृत्त):- श्री. कुरुहिनशेट्टी ज्ञाती संस्था, समाजा तर्फे महायुतीचे शहर मध्यचे उमेदवार देवेंद्र कोठे यांना जाहीर पाठिंबा देण्याकरिता आयोजित केलेल्या कुरुहिनशेट्टी समाज मेळावा उत्साहात पार पडला. या मेळाव्यात समाजातर्फे समर्थन म्हणून देवेंद्र कोठे यांना जाहीर पाठिंबाचे पत्र देण्यात आले.

यावेळी बोलताना देवेंद्र कोठे म्हणाले की, सोलापूर शहर मध्य मतदारसंघातील मतदारांनी माझ्या पाठीशी खंबीरपणे उभे रहावे.

मी विधानसभेत गेल्यानंतर यंत्रमाग कामगार महामंडळाची स्थापना करून व्यवसाय, उद्योगासाठी १५ लाख रुपयांपर्यंतचे बिनव्याजी कर्ज मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याची ग्वाही दिली. तसेच श्री कुरुहिनशेट्टी समाज सर्वांना सोबत घेऊन जाणारा समाज आहे. या समाजासाठी राज्य शासनाकडून सांस्कृतिक भवन बांधण्यासाठी प्रयत्न करू. हातमाग, वस्त्रोद्योग, यंत्रमाग, टेक्स्टाईल क्षेत्रातील कामगार आणि उद्योजकांच्या उन्नतीसाठी प्रयत्न करू. यासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे शिफारस करू. राज्यात पुन्हा महायुतीची सत्ता आल्यानंतर राज्यातील लाडक्या बहिणींना दरमहा २१०० रुपये देण्यात येतील. चांगल्या योजना राबवणाऱ्यांच्या पाठीशी मतदारबांधवांनी रहा, असे यावेळी सांगितले.

याप्रसंगी व्यासपीठावर माजी महापौर श्रीकांचना यन्नम, माजी नगरसेवक मेघनाथ येमूल, संस्थेचे प्रेसिडेंट प्रा. नारायण संगा, उपाध्यक्ष अॅड. सिद्धेश्वर बुगडे, सचिव संजय बुगडे, खजिनदार श्रीनिवास जोगी, सहसचिव श्रीनिवास गडगी, शालेय समितीचे अध्यक्ष प्रभाकर गोरंटी, संस्थेचे पदाधिकारी, विविध संघटनांचे अध्यक्ष व पदाधिकारी तसेच समाजबांधव उपस्थित होते.

# दहिगाव उपसा सिंचन योजना पूर्ण क्षमतेने चालविणार : शिंदे



**माढा (कटूसत्य वृत्त):-** करमाळा तालुक्याच्या पूर्व भागाची वरदायिनी असलेली दहिगाव उपसा सिंचन योजना आपण पूर्ण क्षमतेने चालविणार असून आवर्तन कालावधीमध्ये एखादा पंप जळाल्यास त्याचा परिणाम आवर्तनावरती होतो.

त्यामुळे दहिगाव टप्पा १ येथे अधिकचा १ पंप व कुंभेज टप्पा २ येथे अधिकचा १ पंप असे २ पंप आपण जास्तीचे बसविणार असल्याने योजना पूर्ण क्षमतेने कार्यान्वित राहील. परिणामी शेतकऱ्यांची बारमाही पिके चांगली येतील.दहिगाव उपसाच्या पट्ट्यातील गावांमध्ये शेतकरी उसाबरोबरच केळी या पिकाकडे वळले आहेत. आज कोट्यवधी रुपयांचे उत्पन्न ते काढत आहेत, ही समाधानाची बाब आहे. इथून पुढेही सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या शेतीसाठी लागणारे पाणी आपण त्यांना पूर्ण क्षमतेने बंद नलिका वितरण प्रणालीद्वारे उपलब्ध करून देऊ.त्यामुळे शेतकऱ्यांच्या जीवनामध्ये निश्चितच

समृध्दी येईल आणि ही समृध्दी करमाळा तालुक्याच्या पूर्व भागाचे भविष्य निश्चितच बदलेल, असे आमदार संजयमामा शिंदे यांनी फिसरे येथील जाहीर सभेप्रसंगी सांगितले. यावेळी व्यासपीठावर विलास पाटील, तानाजी झोळ, मनसे तालुकाध्यक्ष संजय घोलप,गणेश चिवटे, हनुमंत मांढरे–पाटील, भरत अवताडे, अमोल काळदाते, गौतम ढाणे, राजेंद्र बाबर, सूर्यकांत पाटील, अजित विघ्ने, दत्ता अडसूळ, विवेक येवले, मानसिंग खंडागळे,राहुल कुकडे, सचिन वीर, फिसरे गावातील प्रदीप दौंडे, संदीप नेटके उपस्थित होते.याप्रसंगी विवेक येवले, राजेंद्र बाबर, गौतम ढाणे, अजित विघ्ने, डॉ. विकास वीर, चंद्रकांत सरडे यांनी मनोगत व्यक्त केले. आभार भरत अवताडे यांनी मानले.

# निवडणूक कालावधीत जप्त केलेल्या रक्कमेवर निर्णय घेण्यासाठी जिल्हास्तरीय समिती स्थापन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-**भारत निवडणूक आयोग ,निवडणूक खर्च संनियंत्रण यावरील अनुदेशांचा सारसंग्रह ऑगस्ट 2023 च्या अनुषंगाने निवडणूकीच्या दरम्यान जप्त केलेल्या रोख रक्कमेवर निर्णय घेण्यासाठी सोलापूर जिल्ह्यातील विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024 च्या अनुषंगाने जिल्हास्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे.

या समितीमध्ये – प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा सोलापूर, खर्च संनियंत्रक नोडल अधिकारी , आणि जिल्हा कोषागार अधिकारी, या तीन अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात आलेला आहे, असे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कुमार आशीर्वाद यांनी कळविले आहे.

**जाहीर प्रसिध्दीकरण** नि.५, दि.कि.अर्ज नं.५३/२०२४

**वारस दाखल्याबाबत जाहीर प्रसिध्दीकरण**

**माढा येथील मे. दिवाणी न्यायाधिश साहेब कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात**

क्रातीसिंह अशोक पाटील/वगैरे } **अर्जदार**

**विरूध्द**

कोणी नाही..... } **सामनेवाला**

ज्या अर्थी यातील अर्जदार हे मौजे वडशिंगे ता. माढा जि. सोलापूर ह.रा. तुकाराम नगर, कुर्डुवाडी, ता. माढा जि. सोलापूर येथील रहिवाशी असुन यातील अर्जदार नंबर १ ते २ यांचे वडील व अर्जदार नंबर ३ हिचे पती कै. अशोक विठ्ठल पाटील रा. कुर्डुवाडी ता. माढा जि. सोलापूर हे ता. १६/०३/२०२४ रोजी मौजे माढा ता. माढा, जि. सोलापूर येथे मयत झालेले आहेत. अर्जदार नंबर १

३ हे मयत कै. अशोक विठ्ठल पाटील यांची अनुक्रमे मुले व पत्नी असल्यामुळे कै. अशोक विठ्ठल पाटील यांचे मृत्युनंतर त्यांना अर्जदार नंबर १ ते ३ यांचे शिवाय इतर कोणतेही जवळचे वारस नाहीत. अर्जदार नंबर १ ३ हेच एकमेव वारस आहेत. मयत कै. अशोक विठ्ठल पाटील यांचे मृत्युनंतर अर्जदार यांना कुटूंब व निवृत्ती वेतनाचा लाभ मिळणेसाठी तसेच फंड ग्रज्यूटी तसेच पेन्शन व जमीनीचे ७/१२ पत्रकी वारस नोंद होणेकामी संबंधीत अधिकारी यांचेकडे तोंडी मागणी केलेली आहे. परंतु अर्जदार यांना सक्षम न्यायालयातुन वारस दाखला आणण्याचे सांगितले असल्याने अर्जदार यांनी या मे कोर्टात वारस दाखला मिळणेकरीता अर्ज दाखल केलेला आहे.

त्या अर्थी या जाहीर प्रसिध्दीकरणाने कळविण्यात येते की, अर्जदाराने मागणी केल्याप्रमाणे अर्जदार यांना वारस दाखला देण्यास कोणाचीही कसलीही हरकत अगर तक्रार असल्यास हे जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झाले पासुन ३० दिवसांचे आत अथवा पुढील नेमलेली तारीख १३/१२/२०२४ रोजी मे. कोर्टात स्वत:हून अगर माहितगार विधिज्ञामार्फत हरकत/तक्रार लेखी स्वरुपात नोंदवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास मे. कोर्टाचे पुढील आदेश पारीत होतील. याची नोंद घ्यावी. जाहीर प्रसिध्दीकरण आमचे सही निशी मे. कोर्टाचे शिक्यानिशी प्रसिध्द केले असे. तारीख ८/११/२०२४

**सही/- क.लिपीक** (शिक्का) **सही /- सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय,क.स्तर,माढा** **दिवाणी न्यायालय,क.स्तर,माढा**

**Format C-1**

(for candidate to publish in Newspapers, TV)

Declaration about criminal cases

(As per the judgment dated 25th September, 2018, of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No 536 of 2011(Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

Name and address of candidate: Mr. SANTOSH SEVU PAVAR

Name of political party. : VANCHIT BAHUJAN AAGHADI

(Independent candidates should write "Independent" here)

Name of Election: FOR ELECTION TO MEMBER OF LEGISLATIVE ASSEMBLY, MAHARASHTRA

*Name of Constituency: 251, SOLAPUR SOUTH CONSTITUENCY

I, Mr. SANTOSH SEVU PAVAR (name of candidate), a candidate for the above mentioned election, declare for public information the following details about my criminal antecedents:

**(A) Pending Criminal Cases**

| Sl. No. | Name of Court | Case No. and dated | Status of Cases(s) | Section(s) of Acts concerned and brief description of offence(S) |
|---|---|---|---|---|
| 1 | Hon'ble Judicial Magistrate of the First Class Court at Pimpri Pune | 215/2024 Sangvi Police Station, Sangavi Pune | Charge sheet filling | Arm Act 1956-Sec.25(3); IPC 1860- Sec.143, 146, 147, 326,148,149,504,506 |
| 2 | Sessions Case No. 181/2024 Hon'ble Sessions Court Pune | 58/2024 Sinhgad road Police Station, Pune | Unready Board ( charge ) | Arms Act, 1956-Sec.25(3) and IPC 1860- Sec.307,504,506, and The Maharashtra Police Act 1951- Sec.135 |
| 3 | S.C.C. No. 34707/2016 Hon'ble Judicial Magistrate of the First Class Court Pune | 3010/2016 Bandgardan Police Station,Pune | Unready Board | Bombay Police Act Sec. 37(1),(3) r/w 135 |
| 4 | R.C.C. No. 1361/2009 Hon'ble Judicial Magistrate of the First Class Court Solapur | 107/2009 Faujdar Chawadi Solapur, Solapur | Unready Board(discharge application) | IPC 1860 – Sec. 420, 467, 468,471 r/w 34 |

**(B) Details about cases of conviction for criminal offences**

| Sl. No | Name of Court & date(s) of order(s) | Description of office(s) & punishment imposed | Maximum Punishment Imposed |
|---|---|---|---|
| 1 | Nil | Nil | Nil |

४७२

**प्रपत्र सी–२**

(संकेतस्थळ, वर्तमानपत्र, दूरदर्शन यामध्ये प्रसिद्ध करण्यासाठी राजकीय पक्षांकरिता)

**पक्षाने उभ्या केलेल्या उमेदवारांच्या गुन्हेगारी पूर्वचरित्राबद्दलचे घोषणापत्र :**

(माननीय सर्वोच्च न्यायालयाने रिट विनंती अर्ज (नागरी) क्रमांक २०११ या ५३६ (पब्लिक इंटरेस्ट फाऊंडेशन व इतर विरुद्ध यूनियन ऑफ इंडिया व इतर) या प्रकरणी दिनांक २५ सप्टेंबर २०१८ रोजी दिलेल्या न्यायनिर्णयानुसार)

राजकीय पक्षाचे नाव : अपक्ष

निवडणूकीचे नाव : २४८ सोलापुर शहर उत्तर विधानसभा

राज्याचे/संघराज्य क्षेत्राचे नाव : महाराष्ट्र

| अ. क्र. (१) | मतदारसंघाचे नाव (२) | उमेदवाराचे नाव (३) | प्रलंबित फौजदारी प्रकरणे (४) | | फौजदारी अपराधांकरिता दोषसिद्ध ठरविलेल्या प्रकरणांबद्दलचा तपशील (५) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | न्यायालयाचे नाव प्रकरण क्रमांक व प्रकरणाची (प्रकरणांची) सद्यःस्थिती | संबंधित अधिनियमांची कलमे वअपराधाचे (अपराधांचे) संक्षिप्त वर्णन | न्यायालयाचे नाव व आदेशाचा (आदेशांचे) संक्षिप्त वर्णन | अपराधाचे (अपराधांचे) संक्षिप्त वर्णन व ठोठावलेली शिक्षा | जास्तीत जास्त ठोठावलेली शिक्षा |
| १ | २४८ सोलापुर शहर उत्तर विधानसभा | मारुती शिवराम सावंत | चीफ ज्युडिशियल मॅजिस्ट्रेट सोलापूर | IPC -341,285, 336 MPA-135 | न्यायालयात दाखल नसल्याने निरंक | रास्ता रोको आंदोलन | निरंक |

* राज्यसभेच्या निवडणुकीच्या किंवा विधानपरिषदेच्या निवडणुकीच्या बाबतीत विधानसभा सदस्यांकडून मतदारसंघाच्या नावाच्या जागी संबंधित निवडणुकीचे नाव नमूद करण्यात येईल.

टीप :

(१) उमेदवारांविरुद्ध प्रलंबित असलेल्या फौजदारी खटल्यांच्या बाबतीतील तपशील ठळक अक्षरात असावा.
(२) वृत्तपत्रांतील मजकूर किमान १२ टंक (फॉँट) आकारात प्रसिद्ध करण्यात येईल.
(३) वरील माहिती प्रत्येक राज्यासाठी/संघराज्यक्षेत्रासाठी राज्यनिहाय प्रसिद्ध करण्यात येईल
(४) जर उमेदवार विशिष्ट पक्षाच्या तिकीटावर निवडणूक लढवत असेल तर, त्याने/तिने पक्षाला त्याच्या, तिच्या विरुद्ध प्रलंबित असलेल्या फौजदारी खटल्यांबाबत कळवणे आवश्यक आहे.
(५) राजकीय पक्षाला गुन्हेगारी पूर्वचरित्र असलेल्या उमेदवाराशी संबंधित माहिती त्याच्या संकेतस्थळावर टाकणे बंधनकारक असेल.
(६) राजकीय पक्ष, संबंधित निवडणुकीचे निकाल घोषित झाल्यापासून ३० दिवसांच्या आत राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना नपत्र सी–५ मध्ये फौजदारी खटल्यांबाबत प्रतिज्ञापत्र प्रसिद्ध करण्याबाबतचा अहवाल सदार करील.

**निवडणूक निर्णय अधिकाऱ्याचे कार्यालय**

मतदारसंघाचे नाव : २४८ सोलापुर शहर उत्तर विधानसभा
राज्याचे नाव : महाराष्ट्र
निवडणूकीचे नाव : २४८ विधानसभा


# Classified - छोटी जाहीरात

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अॅडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

**यात्रा**

उज्जैन, सिहोर, प्रदीप महाराज सह शेगाव, ५ ज्योतिर्लिंग, १८ सप्टेंबर अष्टविनायक, भीमाशंकर, जेजुरी १९ सप्टेंबर, श्रीशैल्य, तिरुपती, रामेश्वर, कन्याकुमारी १० नोव्हेंबर, काशी, अयोध्या २७ नोव्हेंबर

**मल्लिकार्जुन ट्रॅव्हल्स**
**९४२२४६०३१९**

**विकणे आहे**

सोलापूर शहरातील चांगल्या लोकवस्तीतील ST स्टॅन्ड व रेल्वे स्टेशन जवळ आवंतीनगर, शरद पवार शाळेजवळ, लोकमंगल ऑक्सिपार्क, येथील अ विंग मधील ७०४ नंबरचा फ्लॅट विकणे आहे.

**संपर्क:**
9881361260

(सरकार मान्य)

**अथर्व पेस्ट कंट्रोल**

An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी

**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**

9822964815
9421984815

झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**पाहिजेत**


**फॅब्रिकेशन कामासाठी अनुभवी हुशार कामगार पाहिजे.**

**संपर्क:**
**गणेश स्टील फॅब्रिकेशन**
**९९२२५२५२३७**

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.




**नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...**



**दारू... अंमली पदार्थ...**
**गॅरंटेड सुटण्यासाठी...**



व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश ..
(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)

**डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र**

**फोन: 9552619752**

कॉल/व्हॉटस्अॅप करा...
दारू... अंमली पदार्थ...
राम राम करा...

501% रिझल्ट

# राजकारणाचा व्यापार करून लक्ष्मीपुत्र आणला - राजन पाटील



**कुरुल (कटूसत्य वृत्त):-** समोरची माणसं समाजासाठी काम करणारी नव्हे तर समाजाचा वापर करून स्वतःसाठी जगणारी ही लोकं आहेत. थोतांड टीका करून समाजाची दिशाभूल करण्याचं काम या लोकांकडून होत आहे. अनगरकरांवर टीका केल्याशिवाय यांचं पोट भरत नाही. टीका ही विकासात्मक असावी, टीका करताना तालुक्याचे व्हिजन काय आहे हे लक्षात आलं पाहिजे. ज्यांना स्वतःचं व्हिजन नाही अशा लोकांनी राजकारणाचा व्यापार करून जनतेला दावणीला

बांधण्यासाठी लक्ष्मीपुत्र आणला असल्याचा घणाघात माजी आमदार राजन पाटील यांनी केला.

मोहोळ विधानसभा मतदारसंघाचे राष्ट्रवादी अजित पवार गटाचे उमेदवार आमदार यशवंत माने यांच्या प्रचारार्थ आयोजित केलेल्या कुरुल (ता. मोहोळ) सभेत ते बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले की, तालुक्यामध्ये उपटसुंभ्या लोकांची टोळी तयार

झाली आहे. आ. यशवंत माने यांच्यासारखा विकास पुरुष आमदार म्हणून लाभला होता. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांची उमेदवारी कायम ठेवली. आता त्यांना देखील या पाच वर्षात पुन्हा कायम करण्याची संधी आपल्याला आली आहे.

यावेळी उमेदवार आ. यशवंत माने म्हणाले की, माझ्यासारख्या नवख्या चेहऱ्याला राजन पाटील यांनी संधी दिली. कुरुल सारख्या गावात २ हजारांचा लीड तोडून ९७ मतांचे मताधिक्य दिलं. तालुक्यासह मतदार संघातील जनतेने मला स्वीकारलं. या पाच वर्षात माझ्याकडे आलेल्या प्रत्येक कार्यकर्त्यांचं काम करण्याचा मी प्रामाणिकपणे प्रयत्न केला आहे. महाविकास आघाडी व महायुतीच्या माध्यमातून राज्य सरकारकडून मतदारसंघाचा सर्वाधिक विकास करण्याचे भाग्य मला लाभले. येणाऱ्या काळात पुन्हा

कुरुल-पंढरपूर रस्त्याचा वनवास संपविला

मोहोळ तालुक्यासह मतदारसंघामध्ये या पाच वर्षात आ.माने यांनी साडेतीन हजार कोटी रुपयांचा निधी आणला. कुरुल-पंढरपूर हा रस्ता स्वातंत्र्यापासून झाला नव्हता. यासाठी वेगवेगळ्या प्रकारची आंदोलने झाली. रक्ताने पत्र, खड्डयात रक्तदान आंदोलन असा आवाज उठवीला गेला. मात्र वर्षानुवर्ष खड्डेमय रस्त्याचा प्रवास सुखकर केला तो आ.यशवंत माने यांनीच. या रस्त्यासाठी पहिल्यांदा २० कोटी आणि नंतर २७२ कोटी निधी दिला आहे. त्यामुळे या रस्त्यानेजाणारा व्यक्ती आ.माने यांना निश्चितच मत देईल, असे भीमा परिवाराचे प्रवक्ते पांडुरंग ताटे यांनी म्हटले.

एकदा मला सेवेची संधी द्या. पुन्हा एकदा यापेक्षा जास्तीचा निधी खेचून आणण्याची जबाबदारी पार पाडेन, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी स्वाती लांडे, ज्योत्स्ना पाटील, युवा सेनेचे गणेश जाधव, राहुल कसबे, पांडुरंग ताटे, महेश पवार, दीपक भोसले आदींनी मनोगत व्यक्त केले. यावेळी तालुकाध्यक्ष प्रकाश चवरे, जालिंदर लांडे, सरपंच शिला माने, उपसरपंच पांडुरंग जाधव, यतचे दीपक भोसले, भाजपाचे संजीव खिलारे, अस्लम चौधरी, बाळासाहेब पाटील, सुरेश जाधव, चंद्रहार चव्हाण, सीताराम लांडे, सुनील चव्हाण, समाधान पाटील, रमेश जाधव, छत्रपती जाधाव, बाळासाहेब लांडे, धनाजी चंदनशिवे, सुभाष माळी, संभाजी पाटील, बबलू जाधव, यांच्यासह महायुतीचे अनेक पदाधिकारी, ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माऊली जाधव यांनी केले.

# संतोष पवार यांना शहरी भागात उत्स्फूर्त प्रतिसाद



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** वंचित बहुजन आघाडीचे अधिकृत उमेदवार संतोष पवार यांच्या प्रचारार्थ नीलम नगर येथील कलवल फंक्शन हॉलमध्ये झालेल्या भव्य जनसन्मान सभेला हजारो महिलांसह नागरिकांनी प्रचंड प्रतिसाद दिला. हद्दवाढ भागातील नागरिकांच्या समस्या, विशेषतः पाणी, ड्रेनेज, रस्ते, वीजपुरवठा या मूलभूत सुविधांच्या अभावाबद्दल नाराजी व्यक्त करण्यात आली. परिसरातील नागरिकांनी उस्फुर्त पणे भावी आमदार या भूमिकेतून स्वतः परिसरातील विविध समस्यांबद्दल चर्चा केली, यावेळी महिलांची संख्या ही वाखाडण्याजोगी होती, परिसरातील समस्यांना कंटाळूनच हा जनसमुदाय उपस्थित असल्याचे यावेळी अनेकांनी बोलून दाखवले, निधी आणण्याच्या केवळ दाव्यांवर समाधान मानणाऱ्या नगरसेवक आणि आमदारांनी आता पर्यंत जनतेच्या तक्रारींकडे दुर्लक्ष केले असल्याचा आरोप अनेक नागरिकांनी यावेळी केला.

सभेत संतोष पवार म्हणाले, "प्रस्थापित राजकारण्यांच्या स्वार्थी राजकारणाला बाजूला सारण्याची वेळ आली आहे.

तालुक्याच्या विकासासाठी यंदा परिवर्तन घडवा. तसेच या सभेला संतोष पवार यांच्या सौभाग्यवती प्रिया संतोष पवार यांचीही उपस्थिती उल्लेखणीय होती, महिलांच्या दैनंदिन जीवनातील समस्या जाणून घेऊन त्यांना आश्वासित करून सोबत राहण्या विषयीचे आव्हान त्यांनी यावेळी केले तसेच "येत्या 20 नोव्हेंबर रोजी अनुक्रमांक "१२" व "गॅस सिलेंडर" चिन्हावर बटन दाबून संतोष पवार यांना विजयी करण्याचे आवाहनही केले."

या वेळी सभेला माजी नगरसेविका अंबिका बोदु, समाजसेविका संगीता बिराजदार, समाजसेविका लक्ष्मी बंगारे, यांनी आपला जाहीर पाठिंबा असल्याचे जाहीर करून आपले विचार मांडले, या भव्य कार्यक्रमास वंचित बहुजन आघाडीचे आणि मार्ग फाऊंडेशनचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि परिसरातील हजारो नागरिक महिला आणि कार्यकर्त्यांची उपस्थिती भरभरून होती.

# मीनल साठे यांच्या पाठीशी महिलांनी राहावे : चाकणकर



**माढा (कटूसत्य वृत्त):-** अजित पवार यांनी ॲड. मीनल साठे यांना उमेदवारी देऊन मातृशक्तीला नेतृत्व करण्याची संधी दिली आहे. जिल्ह्यात एकमेव महिला उमेदवार असून या वहिणींच्या मागे आपली

ताकद उभी करावी, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाच्या महिला आघाडीच्या

प्रदेशाध्यक्षा रुपालीताई चाकणकर यांनी केले.बुधवारी, टेंभुर्णी येथे आयोजित सभेत त्या

वोलत होत्या. अध्यक्षस्थानी माजी आ.धनाजी साठे हे होते. चाकणकर म्हणाल्या, या मतदारसंघातील जवळपास ९३ हजार महिलांना लाडक्या वहीण योजनेचा लाभ मिळाला आहे. राज्य महिला आयोगाच्या माध्यमातून मी राज्यातील महिलांच्या सुरक्षेची प्रामुख्याने जबाबदारी घेतेय. लेक लाडकी योजनेच्या

माध्यमातून राज्यातील लाखो मुलींच्या भविष्याचा फायदा झालेला आहे. शासनाच्या अन्नपूर्णा

योजनेच्या माध्यमातून महिलांच्या किचनमधील वजेटची जवाबदारी महायुती सरकारने उचललेली

आहे. महायुती शासनाच्या या सर्व जनसामान्य लोकांच्या कल्याणकारी योजना जर चालू ठेवायच्या असतील तर महायुतीच्या उमेदवार ॲड. मीनल साठे यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा

राहावे, असे आवाहन त्यांनी केले.प्रास्ताविक दादासाहेव साठे यांनी केले.दीपाली पांढरे, वर्षा शिंदे, सायारा शेख, प्रियंका परांडे, महेश साठे, योगेश पाटील, महादेव भोसले, भारत आठवले, मारुतीराया वाघमारे,

विभीपण कांवळे, पोपट लोंढे, माया माने,संगीता जोगधनकर, सुनंदा भगत, राहुल केदार,दत्ता जाधव, नंदकुमार मोरे, श्रीशैल मोरे, विष्णू विचकुले, मदन मुंगळे, जयसिंग ढवळे, कल्पना जगदाळे यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी उपस्थित होते.

# पाणी, ड्रेनेज, रस्त्यांची समस्या दूर करू : काडादी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघातील मतदारांनी विकासकामांची अपेक्षा बाळगून मोठ्या विश्वासाने दहा वर्षे भाजपच्या आमदाराला निवडून दिले.मात्र, त्यांनी जनतेचा अपेक्षाभंग केला. मतदारसंघातील मूलभूत प्रश्न सोडविण्याऐवजी त्यांनी द्वेषाचे व सुडाचे राजकारण केले. गल्लीपासून दिल्लीपर्यंत भाजपची सत्ता असूनही हा मतदारसंघ विकासापासून वंचित राहिला. जनतेला समस्यांच्या खाईत लोटणाऱ्या लोकप्रतिनिधीला या निवडणुकीत पराभूत करून या मतदारसंघातील पाणी, ड्रेनेज, रस्ते यासह मूलभूत प्रश्न सोडविण्यासाठी आपल्याला विजयी करावे,असे आवाहन सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघातील अपक्ष उमेदवार व सिध्देश्वर परिवाराचे प्रमुख धर्मराज काडादी यांनी केले.



बुधवारी, विजापूर रस्त्यावरील सैफुल येथून धर्मराज काडादी यांची भव्य पदयात्रा काढण्यात आली.तरुणाई, महिला, ज्येष्ठ नागरिक पदयात्रेत मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. सैफुल चौकात ज्येष्ठ नागरिक काशीनाथ हिंगमिरे यांनी काडादी यांचे पुष्पहार घालून स्वागत केले. पदयात्रेची ओमगर्जना चौकात सांगता झाली. त्यानंतर झालेल्या कॉर्नर सभेत काडादी यांनी मतदारांशी संवाद साधला. ते म्हणाले, दहा वर्षे या मतदारसंघातून निवडून गेलेल्या भाजप आमदारांनी विकासाची कोणतीही कामे मार्गी लावली नाहीत. २०१४ पूर्वी शहरात सिटी बसची सेवा सुरळीत चालू होती. अगदी हद्दवाढ भागापर्यंत सिटी वसेस धावत होत्या. नंतर ही सेवा कोलमडली. आज हद्दवाढ भागात सिटी वस नसल्याने सामान्य जनतेला अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. सिटी वसची सेवा सुधारण्यासाठी आमदारांनी

कोणतीही हालचाल केली नाही.परिवहनच्या कामगारांना देशोधडीला लावले आणि सोलापूरकरांना या आमदारांनी वाऱ्यावर सोडले.

उजनी धरण क्षमतेने भरलेले असतानाही केवळ विकासाची दृष्टी नसल्यामुळे शहराला पाच दिवसांआड तर हद्दवाढ भागाला सहा दिवसांआड पाणीपुरवठा केला जातो. काँग्रेसच्या राजवटीत शहराला दररोज पाणीपुरवठा होत होता. आता पाणी असूनही हद्दवाढ भागातील जनतेला जलसंकटात टाकले आहे. शहरात दोन उड्डाणपूल करण्याची भाजपने नुसती घोषणा केली. केवळ घोपणावाजी करून मतदारांची दिशाभूल करण्याशिवाय या लोकप्रतिनिधींनी काहीच केले

नसल्याची टीका काडादी यांनी केली.भाजपच्या लोकप्रतिनिधीने सोलापूरच्या विकास करण्याऐवजी

सहकार चळवळीतील सिध्देश्वर सहकारी साखर कारखान्याची चिमणी पाडून शेतकऱ्यांची मालकी असलेला हा कारखाना बंद पाडण्याचा प्रयत्न केला.विमानसेवेला या कारखान्याच्या चिमणीचा कोणताही अडथळा नसताना केवळ द्वेपभावनेने चिमणी पाडली. माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी वोरामणी येथे आंतरराष्ट्रीय विमानतळ मंजूर केले होते. त्या विमानतळाच्या विकासासाठी प्रयत्न करण्याऐवजी कुटील राजकारण करून चिमणी पाडली. मतदारसंघातील समस्या घेऊन गेलेल्या नागरिकांवरोवर दोन चांगले शब्द बोलण्याचे औदार्यही त्यांच्याकडे नाही. उध्दट वोलून अपमानित करणाऱ्या या लोकप्रतिनिधीला आता घरी वसविण्यासाठी जनतेनेच ही निवडणूक हाती घेतली आहे.

भाजप व त्या पक्षाच्या लोकप्रतिनिधीला घरी वसविण्यासाठी नागरिक आता पेटून उठले आहेत. त्यामुळे या निवडणुकीत परिवर्तन अटळ असल्याचा विश्वास काडादी यांनी व्यक्त केला आहे. जेव्हा सहनशीलतेचा अंत होतो, तेव्हा परिवर्तन घडते. राज्यातील वरिष्ठ नेतेमंडळींची साथ आणि आपल्या पाठिंब्यावर निवडणूक लढवत असून विजयी झाल्यानंतर या मतदारसंघातील विकासाची कामे मार्गी लावून जनतेच्या समस्या दूर करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करू,अशी ग्वाही काडादी यांनी दिली.

सैफुल चौकापासून निघालेली ही पदयात्रा चिंतामणी गणपती मंदिर, वैष्णवी माता मंदिर, सवेरा

नगर, सैफुल भाजी मंडई, स्वामी विवेकानंद नगर, कोळी समाज सोसायटी, साई हाईटस, कांचनगंगा नगरमार्गे ओम गर्जना चौक येथे विसर्जित झाल्यानंतर तेथे कॉर्नर वैठक झाली. तेथे अंवण्णा कोळी यांनी काडादी यांचे स्वागत केले.पदयात्रेच्या स्वागतासाठी नागरिकांनी आपल्या घरासमोर सडासमार्जन करून व रांगोळी रेखाटली होती. अवधूत शिवगुंडे व रजनीकांत ठेंगील यांनी जेसीवीतून काडादी यांच्यावर पुष्पवृष्टी करून त्यांचे स्वागत केले.सिध्देश्वर कारखान्याचे संचालक शिवानंद पाटील - कुडल, प्रदीप व संदीप पाटील यांनी काडादी यांचे स्वागत केले. शैलजा व

रत्नेश्वरी पाटील यांच्यासह अनेक माता भगिनींनी औक्षण करून काडादी यांना आशीर्वाद दिले. भाजप महिला शहर उपाध्यक्षा अनुराधा सोपान खारे यांनी काडादी यांचे स्वागत करून त्यांना पाठिवा जाहीर केला. शिवराज संगमनेरकर,कलमेश कोलकर, संतोप मडसनाळ,मल्लिकार्जुन उंबरजे, प्रेमला सुरेश नळे यांच्यावतीनेही काडादी यांचे स्वागत करण्यात आले.तत्पूर्वी निघालेल्या शरणराज भव्य काडादी,पदयात्रेत श्रीदीप हसापुरे, शिवानंद व्होनराव,रावसाहेव व्हनमाने, संजीवकुमार कोळी, सिध्दाराम चाकोते यांच्यासह तरुणाई, महिला, ज्येष्ठ नागरिक आदी सहभागी झाले होते.

# मोहोळच्या विकासासाठी आ. यशवंत माने यांना निवडून द्या : अजिंक्यराणा



**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** मोहोळ विरोधकांच्या बोलताना सिनेट सदस्य अजिंक्यराणा पाटील यांनी व्यासपीठावर बोलणाऱ्या व्यक्तींनी इसार घेतला आहे. त्यांच्याकडे सांगितले.काय अर्जेंट विकासाचा आहे. विरोधकांकडे सहा महिन्याच्यावर माणूस टिकत नाही. उमेदवाराला जर विचारल मोहोळ तालुक्यात देगाव कोणत्या दिशेला आहे, तर तेही त्यांना सांगता येणार नाही. पाच वर्षातून यायचं राजन पाटलांवर बोलायचं निवडणूक झाली, की निघून जायचं हे त्यांचं काम आहे. विकासाच्या बाबतीत काय बोलत नाहीत. आपल्या भागाच दळण वळण वाढण्यासाठी बेगमपूर ते वैराग हा ४१५ कोटी निधीचा रस्ता मंजूर केला आहे. तालुक्याचा उर्वरित विकास पुढील येणाऱ्या काळात करणार असल्याचे प्रसंगी मोहोळ तालुक्यातील देगाव (वा.) येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, महायुतीचे उमेदवार यशवंत माने यांच्या प्रचारार्थ मंगळवारी कॉर्नर सभा मंगळवार दि.१२ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ७:०० वाजता झाली. प्रसंगी मनसेचे तेजस आतकरे यांनी देगाव येथील सभेमध्ये महायुतीचे उमेदवार यशवंत माने यांना पाठिंबा जाहीर केला. यावेळी सीना भोगावती जोड़कालवा, सीना नदीवर बॅरेज बंधारे मंजूर केले. त्याप्रमाणे भोगावती नदीवर बॅरेज बंधारे मंजूर करावे अशी मागणी देगाव (वा.) येथील ग्रामस्थांनी केली. यावेळी कार्यकर्ते उपस्थित होते.

# लाडक्या बहिणींना १५०० रुपये दिले अन १९०० रुपये काढून घेतले

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महायुती सरकारने एका हाताने लाडक्या बहिणींना १५०० रुपये दिले. दुसरीकडे महिलांवर महागाई लादून १९०० रुपये काढून घेतले,अशी टीका एमआयएमचे खासदार असदुद्दीन ओवैसी यांनी केली.पानगल हायस्कूलच्या मैदानावर ओवैसींची जाहीर सभा झाली. यावेळी उमेदवार फारूख शाब्दी, जिल्हा निरीक्षक अन्वर सादात, मकबूल शाब्दी,अझहर हुंडेकरी, नसीम खलिफा, महेश कांबळे, शौकत पठाण आदी उपस्थित होते. खा.ओवैसींनी लाडकी बहीण योजना लागू होण्यापूर्वी आणि पैसे दिल्यानंतर झालेली किराणा मालाची दरवाढ वाचून दाखवली. महागाईने या राज्याला बरबाद केले असे सांगत



पोलिसांच्या नोटिशीतील चुका वाचून दाखवल्या जेलरोड पोलिसांनी ओवैसींना प्रक्षोभक भाषण करू नये, अशी नोटीस दिली. ही मराठी होती. मला मराठी कळत नाही. इंग्रजी भाषेत नोटीस द्या. वाचून सही करतो, असे ओवैसींनी सांगितले. यातून पोलिसांची पळापळ झाली. यानंतर ओवैसींनी इंग्रजीतून आलेली नोटीस जाहीरपणे वाचताना त्यातील चुकाही वाचून दाखवल्या.

ते म्हणाले, तुम्ही निवडणुकांकडे हिंदू मुस्लिमांची लढाई म्हणून बघू नका.महागाईच्या विषयाबद्दल बोला. भाजप नेत्यांनी सोलापुरातून लष्कराचे युनिफॉर्म तयार करण्याचे आश्वासन दिले होते.

त्या आश्वासनाचे काय झाले. शरद पवार आयटी पार्कची कोनशिला लावून गेले.पण प्रत्यक्षात काहीच झाले

मग बी टीम कोण याचा विचार करा : शाब्दी शाब्दी म्हणाले, महायुती सरकारच्या काळात लोकांची घरे तोडण्याचे काम सुरु आहे. संविधान, लोकशाहीला संकटात आणण्याचे काम सुरु आहे.

एमआयएम भाजपची बी टीम असल्याची टीका काँग्रेसवाले करतात. आम्ही बी टीम असतो तर लोकसभेला सोलापुरात उमेदवार देऊन काँग्रेसला प्राभूत केले असते. पण भाजपला

रोखण्यासाठी आम्ही उमेदवार दिला नाही. काँग्रेसचे पाच नगरसेवक भाजपमध्ये गेले. मग बी टीम कोण

आहे याचा विचार करा.

जरंगे -पाटलांनी तुमची झोप उडवली मराठा समाजाला आरक्षण देण्याचा शब्द भाजपने दिला होता. आता तो शब्द न पाळल्यामुळे मनोज जरांगे-पाटील यांनी आंदोलन सुरू केले. जरांगे-पाटलांनी तुमची झोप उडवली आहे. तुम्हाला मराठा समाजाला आरक्षण द्यावेच लागेल, असे ओवैसी म्हणाले.

नाही.मतांच्या अधिकाराला जिहाद म्हणू नका खासदार ओवैसी म्हणाले, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान निर्मिती करून मतदानाचा अधिकार दिला. त्याला तुम्ही वोट जिहादचे नाव का देता. हा तर सर्वसामान्य लोकांचा हक्क आहे.

# कामगारांसाठी आमदार व्हायचे आहे आडम मास्तरांची भावनिक साद

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** कामगारांसाठी कष्टकरी, ही निवडणूक लढत असून कामगारांसाठीच आमदार व्हायचे आहे आणि त्यांच्या जीवनात बदल घडवायचा आहे, अशी भावनिक साद सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघातील माकपचे उमेदवार नरसय्या आडम मास्तर यांनी मतदारांना घातली.

बुधवारी, दत्त नगर येथील कार्यालयासमोरून माकप माकपच्या प्रचारार्थ आडम मास्तर यांची पदयात्रा सुरू झाली. या पदयात्रेदरम्यान त्यांनी मतदारांशी संवाद साधला. या पदयात्रेचे ठिकठिकाणी स्वागत करण्यात आले. पूर्व भागातील विविध



नगरातून ही पदयात्रा काढण्यात

आली. या पदयात्रेत महिला व युवक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.आडम मास्तर म्हणाले, आता ही लढाई आरपारची आहे. भाजपने जातीधर्मात संघर्ष पेटवून तो तेवत ठेवला आहे. महागाई, बेरोजगारीनेकंबरडे मोडले असताना सत्ताधारी भाजप मात्र आमदार फोडून सत्तेत मश्गुल आहेत. त्यांना जनतेच्या प्रश्नाशी काही देणेघेणे नाही.त्यामुळे कामगारांच्या प्रश्नांसाठीच आपण निवडणूक रिंगणात आहोत, असेही ते म्हणाले. या पदयात्रेत ॲड. एम. एच. शेख,नलिनी कलबुर्गी, नसीमा शेख,युसुफ मेजर, अब्राहम कुमार, ॲड. अनिल वासम, श्याम आडम यांच्यासह माकपचे पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.

# माझा प्रत्येक क्षण विकासासाठी समर्पित

## महादेव कोगनुरे, दक्षिण सोलापूरच्या ग्रामीण भागात मनसेला प्रतिसाद

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** माझा प्रत्येक क्षण हा विकासासाठी समर्पित असेल. मी जिथे जातोय तिथे मतदारांचे प्रेम मला भरभरून मिळत आहे. हे प्रेम आणि होणाऱ्या गर्दीमुळे मला माझ्या विजयाचा विश्वास आहे असे प्रतिपादन महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अधिकृत उमेदवार महादेव कोगनुरे यांनी केले. दक्षिण सोलापूरच्या ग्रामीण भागात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अधिकृत उमेदवार महादेव कोगनुरे यांच्या सभा, पदयात्रा, कॉर्नर बैठकांना प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. बुधवारी शहरात निघालेल्या पदयात्रेमध्येही हजारो नागरिक सहभागी झाले होते. गुरुवारी सायंकाळी निंबर्गी, तेलगाव भीमा, खानापूर, कुसूर विंचूर याठिकाणी कॉर्नर सभा आणि प्रमुख कार्यकर्त्यांच्या बैठका झाल्या. यात महादेव कोगनुरे



यांनी मतदान करण्याच्या केलेल्या आवाहनाला नागरिकांनी जोरदार प्रतिसाद दिला. महादेव कोगनुरे यांचा विजय असो, येऊन येऊन येणार कोण मनसे शिवाय आहेच कोण अशा घोषणांनी परिसर दुमदुमुन गेला. रात्री उशिरापर्यंत कार्यकर्ते आणि मतदार कोगनुरे यांची वाट पाहात होते. कोगनुरे यांचे आगमन होताच आतषबाजी करण्यात येत होती. पुष्पगुच्छ, पुष्पहार घालून कोगनुरे यांचे ठिकठिकाणी स्वागत करण्यात आले. महिलांनी औक्षण करून आशीर्वाद दिले.आता विजय आपलाचशहरासह ग्रामीण भागातही महादेव कोगनुरे यांना मिळणारा प्रतिसाद पाहता आता विजय आपलाच अशा प्रतिक्रिया पदाधिकारी कार्यकर्त्यांनी दिल्या. कारखानदार, प्रस्थापित राजकारणी निवडून देण्यापेक्षा माझे मत प्रामाणिक कार्यकर्ता आणि जनसेवक असलेल्या महादेव कोगनुरे यांनाच देणार अशा प्रतिक्रिया मतदारांतून उमटू लागल्या आहेत.

# भाजप च्या देवेंद्र कोठे यांच्या विरोधात माकप चे ॲड.अनिल वासम यांची आचार संहिता भंग प्रकरणी निवडणूक निर्णय अधिकारी कडे तक्रार करून गुन्हा नोंदवले

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024 साठी 249 सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघातून भारतीय जनता पक्षाचे अधिकृत उमेदवार देवेंद्र कोठे हे आपली उमेदवारी लढवीत आहेत. यादरम्यान उमेदवारांच्या प्रचारार्थ प्रचार करताना त्यांचे प्रचारक धार्मिक स्थळी सुद्धा जाऊन विना परवाना मतदारांना आवाहन करत प्रचार आहेत. हे निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार व निवडणूक निर्णय आयोगाच्या आदर्श आचारसंहिते नुसार भंग करणारी बाब आहे. तेव्हा याबाबत निवडणूक निर्णय अधिकारी मार्फत नेमण्यात आलेल्या भरारी पथकाकडून या बाबीकडे सर्रास



दुर्लक्ष होत असल्याची तक्रार मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे ॲड.अनिल वासम यांनी 249 निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे तक्रार दिलेली आहे. त्या अनुषंगाने भरारी पथकाकडून तक्रारीची दखल घेत सखोल चौकशी करून बुधवारी जेलरोड पोलीस ठाणे येथे देवेंद्र कोठे यांच्या विरोधात भारतीय न्याय संहिता 2023 कलम 223 नुसार गुन्हा नोंदवण्यात आला. आचार संहिता भंग प्रकरणी योग्य व कायदेशीर कारवाई करण्यास विलंब झाल्यास किंवा कसूर केल्यास न्यालयात धाव घेण्याचे मत मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे अधिकृत उमेदवार कॉ. नरसय्या आडम मास्तर यांचे उमेदवार प्रतिनिधी ॲड अनिल वासम यांनी व्यक्त केले आहे.

सोमवार दिनांक 11 नोव्हेंबर रोजी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने 249 सोलापूर शहर मध्य विधानसभा निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय आचारसंहिता कक्षाकडे लेखी संबंधित तक्रारीबाबत पुराव्यासह तक्रार दिलेली आहे.या तक्रारीत म्हटले आहे की,गुरुवार दि. ७ नोव्हेंबर २०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता भारतीय जनता पक्षाचे उमेदवार देवेंद्र राजेश कोठे यांच्या प्रचारार्थ पूर्वविभाग श्रीदत्त मंदिर देवस्थान दत्त नगर सोलापूर येथे उमेदवाराचे प्रचारक माजी नगरसेवक मेघनाथ येमूल, धनश्री कोंड्याल यांनी विना परवाना धार्मिक स्थळ असणारे श्रीदत्त मंदिर येथे म्हणाल्या कि, सर्वांना नमस्कार, आज २४९, सोलापूर मध्य विधान सभेचे अधिकृत उमेदवार देवेंद्र दादा कोठे आपणा सर्वांचे लाडके भाऊ उमेदवारला उभारलेले आहेत. सवार्नी कमळ या चिन्हा बटन दाबून प्रचंड मताने विजयी करावी, हि विनंती करते. सवार्नां माहिती आहे कि,भाजपालाचा मतदान का करावे ?आज आपण मंदिरात आलेले आहोत. आपल्या मंदिरातले देव सुरक्षित ठेवण्यासाठी आपण भाजपला मतदान कराव. असे विनंती करते. अशा प्रकारे मंदिरात प्रचार केलेला आहे.